Volume -5, Issue 1 (Jan 2024)

# Special Issue

# on

# Climate Change Resilience : Innovative Trends In Education Leading To Atmanirbhar Bharat

## Part - II

International Journal of Multidisciplinary Research and Technology

ISSN 2582-7359

Peer Reviewed Journal

Impact Factor 6.325

Published By

Taran Publication

# JOURNAL DETAILS

| | |
|---|---|
| Name of Journal | **International Journal of Multidisciplinary Research and Technology** |
| e-ISSN | **2582-7359** |
| Subject | **Multidisciplinary** |
| Publisher | **Taran Publication** |
| Impact Factor | **6.325** |
| Website | **www.ijmrtjournal.com** |
| Contact Number | **8950448770, 9996906285** |
| Country of Publication | **India** |
| Editor-in-Chief | **Dr. Mandeep Kaur**<br>**&**<br>**Dr. Indrajeet Ramdas Bhagat** |

# INDEX


| S. NO. | TITLE | PAGE NO. |
|---|---|---|
| 1. | **Impact of GST on Micro, Small & Medium Enterprise**<br>*Dr. Madan Rambhau Markande* | 1 |
| 2. | **मानवीय पर्यावरणाची संयुक्त राष्ट्राची सुत्रे**<br>*डॉ.हांगे एस.एस* | 5 |
| 3. | **हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम**<br>*डॉ.अशोक मारुती कोरडे, पुजा सोपान धनवटे* | 8 |
| 4. | **पर्यावरण समस्या**<br>*डॉ.प्रा.तांदळे एस.एस.* | 11 |
| 5. | **भारतीय सिनेमा व हवामानातील बदल**<br>*डॉ. राधाकृष्ण एल. जोशी, मनोज ब. देवकर* | 13 |
| 6. | **अहमदनगर जिल्हातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीचा एक भौगोलिक अभ्यास**<br>*शिवाजी नवनाथ हुलुळे* | 15 |
| 7. | **परकीय चलन बाजार**<br>डॉ. पाऊलबुद्धे अनुराधा रामभाऊ. | 19 |
| 8. | **हवामानातील बदल आणि साहित्य**<br>*डॉ. डोईफोडे युवराज गोपीनाथ* | 22 |
| 9. | **शाश्वत पर्यावरणीय विकासावर आर्थिक विकासाचा झालेला परिणाम - एक अभ्यास**<br>*डॉ. सिध्देश्वर महादेव मुंडे* | 25 |

# Impact of GST on Micro, Small & Medium Enterprise

***Dr. Madan Rambhau Markande***
Head, Department of Commerce
Gandhi Mahavidyalaya, Kada
Tq-Ashti: Dist-Beed-414202 (MS) India

**Abstract**

GST **-** A broad based and single comprehensive tax system was most awaited bill, which passes on 6th may 2015. It was debated that.GST will remove the cascading effect of tax by giving input tax credit to SME, and lead to economic integration'. With broad debate on GST, country's most important sector, ME, also feel the heat of GST. SMEs are the model of socio – economic policies of Government of India. India has second largest number of SMEs in the world next to china, and they are the next best sector which provides largest employment after agriculture in the economy. It is been argued that GST will enhance the SME efficiency. Thus, it has been a focus of study about the impact of GST on SME sector. In this paper concentrates on the GST model, to learn the basics of GST implementation in India and extend the topic to the SME sector's growth.

(**Keywords**: GST model, efficiency, input, tax credit, SMEs.)

**Introduction:-**

GST Bill has described as a reform measure of unparalleled importance in independent India. A Much delayed bill, passed on 6th may 2015, took its birth in 2000 by Vajpayee Government. Since then GST hass was in the news for numerous reasons. It is expected that GST will transform the India's indirect tax system by simplifying it at both centre and state level. A Very important point to be noted here is, there would be 'no tax on tax,. On the destination principle, the tax is at the last stage. The Small and medium enterprises (SMEs) are the major sector which is promoting Indian economic growth by contributing 40 % Indian workforce and nearly 17 % to the GDP growth rate. Thus, it is inevitable to study the major change in the tax system which is going to occur in 2016.

To begin the discussions let us know the meaning and basic model of GST. Goods and Service Tax – GST is a tax levied on manufacture, Sale and consumption of goods and services, with comprehensive and continuous chain of set – off benefits from the producer's point and service provider's point up to the retailer's Level. GST is basically a well designed destination – based value added tax.

**Objectives of study**

(a) The present paper study GST on the basis on following objectives
(b) To understand the present structure of tax
(c) To study the Loophole in the VAT
(d) To know the implementing model of GST
(e) To understand the GST's impact on the SME sector of India
(f) Analysis of SMEs future prospects with GST

**Scope of the Study**

The paper studies the background of GST and its implementation. Then it applies the GST on the SME sector of the economy. The paper does the secondary data work and considered many articles and conference outcomes.

**Methodology**

Secondary sources of data are used. Data published by various institutions such as government of India, World Bank Consultative Group to Assist the Poor (CGAP), Reserve Bank of India (RBI) used for the purpose of the present paper.

The paper is organized into 9 parts. Following this introduction, we understand the present tax structure by basing the knowledge before VAT and after VAT. It then takes up the theoretical and conceptual issues surrounding the

GST on SME development. Part three present understanding of the Input credit mechanism and the benefits to SME sector as a whole.

### Understanding present tax structure

To understand the impact of GST on the SMEs, it is relevant to understand the prevalent tax structure in India. Task force on Implementation of Fiscal Responsibility and Budget Management Act, 2003, commented as, 'high '. Import tariffs, excises and turnover tax on domestic goods and series have enormous cascading effects leading to a distorted structure of production, consumption and exports. This problem can be effectively addressed by shifting the tax burden from production and trade to final consumption and from savings to consumption. The existing tax system introduced innumerable distortions resulting in inefficient resources allocation and adversely impacting GDP growth. It also provides incentives to firms to engage in political lobbying for exemptions and favorable modifications in the tax schedule. The Indian consumer is known to be remarkably sensitive to apparently small changes in relative prices. The goal of a rational tax system is to empower households to engage in undistorted decision making, driven by their own needs and preferences.' It is observed that, the tax structure prior to VAT and CENVAT was irrational and regressive. The tax system at time was not providing a level playing field to all the market players.


### VAT: How successful

The concept of VAT was first introduced in India in Indirect taxes in the year 1986 for selected number of commodities in terms of MODVAT. In 2002-03, all commodities were included in terms of CENVAT. During 2004-05 , service tax were also added to CENVAT and by this time states also started implementing VAT for sale of goods in the state. However at present there is no seamless transfer of goods and service in the country and tax is not a mere pass through during production and distribution and is added as cost in many cases during the intermediate stage.

Currently goods are taxed under VAT regime implemented by state government and services are taxed under service tax regime implemented by central government. As VAT is implemented by state government, each state has different VAT rates, VAT regulation and Vat procedures leading to complications. Further, in addition to VAT and Service Tax there are various other tax regulations that business must comply with like Central Sales Tax (CST), additional Custom Duty, Purchase Tax, Luxury Tax etc. Despite the success with VAT, there are still certain short comings in structure in the levy of VAT both at central and state level.

### Understanding GST- GST model

Goods and Service Tax creates an audit-trail of value chain across the income and production chain. Introduction of GST make the Indian products competitive in domestic and international market. GST regime intends to subsume most indirect taxed under a single taxation regime. GST is a value added tax levied across goods and series. This is expected to help broaden the tax base, increase tax compliance and reduce economic distortions caused by inter-state variations in taxes.[3] The main idea is no good and service is exempt, and there is no differentiation between a good or service, whether as an input or as a finished product. The simple model of GST can be summed in the following diagram:



India has adopted dual GST, which can be understand both centre and state GST with IGST(integrated GST) for inter-state trade of goods and services The GST includes both centre and state taxes which are listed in the following table.

| GST | |
|---|---|
| **Centre Taxes** | **State Taxes** |
| Service Tax | VAT |
| Central Excise Duty | CST |
| Additional Custom Duty | State cess and surcharges |
| Special Additional Duty of Customs | Octroi and entry tax |
| Central Cess and surcharges | Purchase tax |
| | Luxury tax |
| | Lottery and gambling tax |
| | Entertainment Tax |

Under GST, tax pain on inputs is deducted from the tax payable on the output produced. This input credit set off operates through the manufacturing and distribution stage of production. The tax is collected only at the place of consumption. This design addressed cascading of taxes.

**Certain main features of GST**

- GST would be applicable on supply of goods or series as against present concept of tax on the manufacture or on sale of goods or provision of services.
- It would be dual GST: Centre and State simultaneously levying it on common base
- Integrated GST on inter-state supply of goods/series collected by Centre.
- Import of goods and services are treated as inter-state supply of goods and series and subject to IGST.
- A non-violable additional tax not exceeding 1% on inter-state supply of goods would be levied by centre and retained by originating state at least for 2 years

**GST and its impact on SME**

SME is always represented the model of socio-economic policies of Government of India which emphasized judicious use of resources. The SME are being the major sector of the Indian economy face problems with respect to finance and procedural haphazard. The present threshold prescribed in different state VAT acts below which VAT is not applicable varied from state to state. The existing threshold of goods under state VAT is Rs. 5 lakhs for a majority of bigger states and a lower threshold for north eastern states and special category states. A uniform state GST threshold across states is desirable and therefore, the Empowered committee has recommended that a threshold of gross annual turnover of Rs. 1Olakh both for goods and series for all the states and union territories may be adopted with adequate compensation for the states with lower threshold has prevailed in the VAT regime

**Conclusion**

The SMEs being the core sector of Indian economy today by contributing to 40% of employment and 17% to the GDP has to look into the depth. The proposed GST will have major positive effect on the growth of SMEs and it expected from the Finance Minister that, GST will increase the GDP growth by 2%. Thus, there is a need to look into

the impact of GST on SMEs and have to make proper road map for them to sustain in the international competition flood.

## Reference

1. GST-the Game Changer by P.Veera Reddy & P.Mamatha, commercial Law Publishers, 2015
2. GST in India, by Sumit Dutt Manjumdar, centax publications pvt ltd, 2014
3. Southern Economist, July 15,2015
4. The Constitution (122nd Amendment)Bill , 2014(GST), PRS Legislative Research.
5. Journals (Online)
6. http://www.business-standard.com/article/economy-policy/gst-to-bring-seamless-input tax-credit-experts-1 10053100032_ 1.html
7. www.business-standard.com
8. www.gstindia.com
9. http://economictimes.indiatimes.com/topic/GST

International Journal of Multidisciplinary Research and Technology
ISSN 2582-7359, Peer Reviewed Journal, Impact Factor 6.325
www.ijmrtjournal.com

# मानवीय पर्यावरणाची संयुक्त राष्ट्राची सुत्रे

***डॉ.हांगे एस.एस***

कला महाविद्यालय, नांदूर घाट, ता.केज जि.बीड

पर्यावरणात माणासाचे महत्तवाचे स्थान आहे. बुध्दीच्या जोरावर माणूस पर्यावरण संकल्पनेत महत्तावाचे भूमीका बजावत आहे. त्याचा योग्य किंवा दुरुपयोग करणे हे त्याच्याच हाती असल्याने तो पर्यावरणाच्या केंद्रास्थानी आहे.

पर्यावरण म्हणजेच आपल्या भोवताली असणारे सगळेच घटक येत असतात. आपल्या भोवतीचे वृक्ष, पक्षी, प्राणी, माणूस, जमीन, पाणी, हवा, जंगल, डोंगर या सर्वांचे एकत्रित असणे म्हणजे परिसर. पर्यावरणात या सगळयाच घटकांचा एकत्रीतपणे विचार करण्याची आवश्यकता असते. हे सगळे घटक एकमेकांवर अवलुंबुन असतात. अधुनिकिकरणात या पर्यावनणाला धोका पोहूच नये. पर्यावरणाच्या समस्या या त्या देशाच्या समस्या नसुन सपुर्ण जगाच्या समस्या आहे. जागतिक हितासाठी त्या सामुदायिक रितीनेच सोडवायला हव्यात असा दष्टीकोण संयुक्त राष्ट्राने घेऊन मानवीय पर्यावरणासाठी स्वीडन मध्ये १९७२ ला आंतरराष्ट्रीय परिषद घेऊन त्यामध्ये संयुक्त राष्ट्र संघाने २६ सुत्रे महाधिकार पत्र म्हणजेच मेग्नाचार्य पुढील प्रमाणे घोषित करण्यात आले आहे. ज्यामध्ये माणूस सुखी आणि मर्यादाशील जीवन जगू शकेल, जिथे स्वातंत्र्य, समता आणि अन्न, वस्त्र, निवारा यांची पुरेशी सुविधा उपलब्ध असेल अशा पर्यावरणात माणसाला जगण्याचा मुलभूत अधिकार आहे आणि त्याचबरोबर त्याच्या स्वता:साठी व भावी पिढयांसाठी, सुरक्षित आणि सुधारेलेले पर्यावरण उपलब्ध करुन देण्याची महत्तवाची जबाबदारीही त्याच्यावर आहे. या संदर्भात रंग- भेद, जात, धर्म भेदभाव अशा प्रकारच्या कोणत्याही वृत्तीची निंदा केली पाहिजे आणि त्यांना (दूर ठेवले पाहिजे) नष्ट केले पाहिजे.

विचारपुर्वक केलेल्या योग्य त्या उपायोजना आणि त्यांची अंमलबाजावणी करुन नैसर्गिक साधने, हवा, पाणी, जमीन वनस्पती, जीवमात्र आणि विशेषत: नैसर्गिक परिस्थितिकी व्यवस्था ही आताच्या आणि भावी पिढीच्या कल्याणासाठी सुरक्षित ठेवली पाहिजे. पृथ्वीवरच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची पुनर्निर्मिती करु शकणारी क्षमता सांभाळून ठेवायला हवी आणि त्यांची शक्यतो पुनर्स्थापना करायला हवी.

वन्यप्राण्यांची आणि त्यांच्या निवासस्थळांची सुरक्षा आणि योग्य अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी माणासाची आहे. त्यांना आज अनेक करणांनी धोका निर्माण झाला आहे. म्हणून आर्थिक विकासाच्या योजना तयार करताना निसर्ग संरक्षण- वन्यजीव संरक्षण यांना त्यात योग्य ते स्थान देणे आवश्यक आहे.

ज्यांची पुनर्निर्मिती होत नाही अशा नैसगिक साधनसंपत्तीचा उपयोग काटकसरीने करायला हवा. ती संपुर्णपणे नष्ट होणार नाही यांची काळजी घ्यायला हवी या संपत्तीचा लाभ संपुर्ण मानवजातीला कसा होईल याकडे लक्ष ठेवायला हवे.

विषारी रसायने, पदार्थ तसेच उष्णतेचे उत्सर्जन पर्यावरणाला हानी पोहचवत असतात, म्हणूनच त्यांचे प्रमाण वाढू न देण्याची काळजी घेतली पाहिजे. प्रदूषण रोखण्यासाठी सगळयाच देशांत चालणाऱ्या लोकसंघर्षाला न्याय मिळायला हवा.

सागरी प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने कडक उपाययोजना करायला हवी. जलचरांचे जीवनच अशा प्रदूषणामुळे नष्ट होत आहे. माणसाच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. असे पदार्थ समुद्रात मिसळून प्रदूषण निर्माण करणार नाही याची प्रत्येक राष्ट्राने काळजी घेतली पाहिजे.

माणूस जिथे राहतो आणि जिथे काम करतो तिथले वातावरण चांगले राहण्यासाठी आर्थिक आणि सामाजिक प्रगती आवश्यक असते. त्याचा जीवनस्तर उंचावण्यासाठी आणि सुयोग्य पर्यावरणासाठी आर्थिक आणि सामाजिक अनुकूल वातावरण निर्माण करणे आवश्यक असते.

विकासाला वंचित राहिल्यामुळे आणि वारंवार येणाऱ्या नैसर्गिक संकटांमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत असतो. पर्यावरणाची ही हानी भरुन काढण्यासाठी विकसित देशांकडून आर्थिक व तांत्रिक साहाय्य उपलब्ध केले गेले पाहिजे.

विकसनशील देशांसाठी वस्तूंच्या किमती स्थिर असणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या कच्या मालाला योग्य किंमत मिळणे महत्तवाचे आहे. कारण अर्थव्यवस्था आणि पर्यावरण व्यवस्था यांचा परस्पर संबंध असतो.

सर्व देशांची पर्यावरंणनीती ही सतत उन्नतशील असायला हवी. विकसनशील देशांच्या सध्याच्या भविष्यातील विकास योजनांवर त्या नीतीचा अनिष्ठ परिणाम होणार नाही यासाठी पर्यावरणनीती तयार करतानाच काळजी घेणे आवश्यक आहे.

विकसनशील देशांना त्यांची स्थिती पाहून व आवश्यकता लक्षात घेऊन त्याप्रमाणे पर्यावरण सुधारणा व सुरक्षा कार्यासाठी साधनसामग्री आणि आर्थीक मदत उपलब्ध करुन द्यायला हवी. त्यामुळे आपल्या विकास योजना तयार करताना ती राष्ट्रे त्यात पर्यावरण संरक्षणाला महत्तवाचे स्थान देतील.

पर्यावरण संवर्धनात नैसर्गिक साधनसामग्रीची व्यवस्था विवेक दृष्टीने व्हावी यासाठी राष्ट्रांनी आपल्या विकास योजना तयार करताना समग्र आणि व्यापक अशी दृष्टी ठेवली पाहिजे. त्यामुळे मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि विकास यांचा योग्य मेळ घातला जाऊ शकेल विकास आणि पर्यावरण-संरक्षण- संवर्धनाची गरज, यांमध्ये निर्माण होणारा कोणताही वाद विवेकपूर्ण पध्दतीने सोडविला जाऊ शकतो, याचे भान प्रत्यकाने ठेवले पाहिजे.

लोकसंख्या आणि शहरीकरण यांवर अशा त-हेची योजना तयार केली गेली पाहिजे. की ज्यामुळे पर्यावरणाला हानी न पोहोचता सगळयांना जास्तीत जास्त तन्हेने सामाजिक, तसेच आर्थिक आणि पर्यावरणीय लाभ मिळू शकतील. या संदर्भात वंशवादी आणि वसाहतवादी प्रवृतींच्या फायद्यासाठी केलेल्या योजना-प्रकल्प बंद करावे लागतील.

काही क्षेत्रांमध्ये वाढत्या लोकसंख्यमुळे पर्यावरण व विकासावर अनिष्ठ परिणाम होतो, तर काही क्षेत्रांमध्ये अपुऱ्या लोकसंख्यमुळे पर्यावरण संवर्धन व विकास गती घेत नाही, त्या ठिकाणी मुलभूत मानवी अधिकारांसाठी निःपक्षपाती, डेमोग्राफर्सने सुचविलेली नीती राष्ट्रांकडून अंगिकारली जावी.

पर्यावरणाची गुणवत्ता वाढविण्याची गरज आहे हे ध्यानात घेऊन पर्यावरणीय संसाधनांच्या सुनियोजनाचे, त्यांच्या व्यवस्थापनाचे आणि नियंत्रणाचे काम राष्ट्रीय संस्थांकडे सोपविण्यात यावे.

आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी काम करणारे विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण संकटाचे निदान करण्यासाठी तसेच त्यावरच्या उपाययोजना आणि संकट नियंत्रित करण्यासाठी आणि लोककल्याणासाठी उपयोगात आणले पाहिजे.

मानवाच्या हितासाठी पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या हेतूने व्यक्ती आणि संस्था तसेच मुले, तरुण आणि वृध्द यांच्यासाठी पर्यावरण आणि शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. प्राथमिक सुविधांचा अभाव असलेल्या व्यक्ती आणि समाज यांना पर्यावरण शिक्षण देऊन त्याचे महत्व पटवून दिले जाणे आवश्यक आहे. कारण अशा शिक्षणामुळेच त्यांच्यात पर्यावरण जागृती निर्माण होईल आणि पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या कामात त्यांचाही सहभाग लाभेल. तसेच प्रसार माध्यमांकडूनही पर्यावरण शिक्षणासंबधी जनजागृती होणे आवश्यक आहे.

पर्यावरण समस्येसंबंधी विशेषतः विकसनशील देशांमध्ये, राष्ट्रीय तसेच बहुराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरण समस्यांवर वैज्ञानिक संशोधन चालू राहिले पाहिजे. नवनव्या संशोधनांची माहिती त्यांना सातत्याने मिळाली पाहिजे. या देशांना कोणताही आर्थिक बोजा न पडता पर्यावरणीय माहिती उपलब्ध होत राहणे आवश्यक आहे.

संयुक्त राष्ट्राचे घोषणापत्र आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे, कोणत्याही राष्ट्राला त्याच्या प्रदेशातील साधनसंपत्तीचा, पर्यावरण नीतीला धरुन उपभोग घेण्याचा अधिकार आहे. मात्र त्यामुळे इतर कोणत्याही देशाला हानी पोहोचणार नाही याची त्या राष्ट्राने काळजी घेऊनच उपभोग घ्यायचा आहे.

एखाद्या राष्ट्रात चाललेल्या कामामुळे जर त्या राष्ट्राबाहेर प्रदूषण निर्माण होत असेल किंवा पर्यावरणाला धोका निर्माण होत असेल, तर तिथल्या लोकांच्या नुकसानीची जबाबदारी आणि नुकसान भरपाई देण्यासाठी तरतुद असणारा आंतरराष्ट्रीय कायदा तयार करण्यासाठी राष्ट्रांनी सहकार्य करणे गरजेचे आहे.

आंरतराष्ट्रीय स्तरावर स्वीकारली गेलेली किंवा राष्ट्रीय पातळीवर निर्धरित केलेली गुणवत्ता मानके लागू करण्यापुर्वी विविध प्रचलित सामाजिक व्यवस्था आणि त्या मानकांची त्या देशातील उपयुक्तता लक्षात घेऊनच लागू करणे योग्य ठरेल. कारण विकसित देशांच्या दृष्टीने जी मानके उपयुक्त कायदेशीर किंवा यथायोग्य असतील तीच मानके विकसनशील देशांच्या दृष्टीने निरुपयोगी तसेच सामाजिक मूल्यांच्या दृष्टीने अनिष्ट, अयोग्यही होऊ शकतात.

लहान आणि मोठया देशांचे पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यांसंबंधीची आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व प्रकरणे समान पाळीवर, परस्पर सहकार्याने सोडविली गेली पाहिजे. सगळीकडे चालू असलेलया घडामोडींमुळे बिघडणाऱ्या पर्यावरणावर नियंत्रण ठेवणे, ते पुर्वस्थितीवर आणणे याची योग्य ती व्यवस्था द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय स्वरुपात सहकार्याच्या भावनेने करणे आवश्यक आहे. ती व्यवस्था करताना त्या त्या देशाचे हित व सार्वभौमत्व लक्षात घेऊनच करायची आहेत.

आंतरराष्ट्रीय संघटना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी एका कुशल समन्वकाची गतिशील भूमिका पार पाडत आहे ( हे राष्ट्रांनी पटवून दिले पाहिजे ) याची खात्री राष्ट्रांनीच द्यायला हवी.

माणूस आणि पर्यावरणाला परमाणू हत्यारांच्या परिणामांपासुनच, तसेच जनसंहाराच्या इतर साधानांपासुन वाचवले. अशा संहारक शस्त्रास्त्रांवर बंदी घालण्याच्या आणि ती संपुर्णपणे नष्ट करण्याची आंतरराष्ट्रीय संघटनांच्या राष्ट्रांनी तात्काळ करार केले पाहिजेत.

**सारांश :**

मानवीय पर्यावरणामध्ये पर्यावरणीय समस्या या सगळया जगालाच चिंतीत करणाऱ्या आहेत. जागतिक हितासाठी त्या सामुदायिक रितीनेच सोडवायला हव्यात. पर्यावरणाचे संतुलन राखणे हे कर्तव्य समजुन घेण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिक सामुदायाने पर्यावरणाचे नितिमुल्ये जोपासली त्याचे आचरण केले तर निसर्गाचा ऱ्हास, प्रदुषण आणि नाश थांबविता येणे शक्य आहे. किंबहुना तरच निसर्ग टिकेल खऱ्या अर्थाने आपणा सर्वांनी पर्यावरणाची नितिमुल्ये जोपासली तरच वृक्षावली आम्हा सोयरे वणचरे असतील.

**संदर्भ सुची :**

१. आरोग्यदायी पर्यावरण - भुषण पटवर्धन
२. पर्यावरण अध्ययन - गुर्जन आणि जाट
३. पर्यावरणाचा अभ्यास - NCERT पुस्तकाचा सारांश
४. दैनिके, मासिके, वेबसाईड इत्यादी.

# हवामान बदलाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम

***डॉ.अशोक मारुती कोरडे***
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस.के.गांधी महाविद्यालय
कडा.ता.आष्टी, जि.बीड
विद्यापीठ, छ.संभाजीनगर

***पुजा सोपान धनवटे***
पीएच.डी.संशोधक विद्यार्थिनी
अर्थशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

**प्रस्तावना :**

निसर्गसृष्टी ही विविधतेने नटलेली आहे. निसर्ग आणि मानव यांचा घनिष्ठ संबंध आहे. या सृष्टीची सुंदरता आणि निसर्ग पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवण्याकरीता सर्व देशांनी ५ जून १९७२ रोजी स्टॉकहोम येथे एकत्र येऊन पहिले विचार मंथन केले. या विचार मंथानतून सृष्टीची गौरव करणारा ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये हवामान बदलामुळे शेती क्षेत्रावर होणारा परिणाम अत्यंत महत्वाचा व गंभीर विषय मानला जातो. भारतीय शेती ही अनियमित वातावरणातच केली जाते. त्यामुळे हवामान आणि भारतीय शेती यांचा नाजूक संबंध आहे. शेती क्षेत्राबरोबर इतरही क्षेत्रावर हवामान बदलाचे परिणाम दिसून येतात. अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र, उद्योग, सेवा, व्यापार, रोजगार, पर्यटन इ. घटकांवर हवामान बदलाचा परिणाम होत असतो. हवामानात तापमान, पर्जन्य, हवा, आर्द्रता, सूर्यप्रकाश, हिमवृष्टी, गारपीट, धुके, दव इ. घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांमध्ये असमतोल निर्माण झाल्यास अतिवृष्ट, पुर, चक्रीवादळे, प्रदुषण, अवर्षण, क्षय, आम्ल पर्जन्य इ. सारख्या समस्या निर्माण होतात म्हणून आज कोणत्याही देशात किंवा प्रदेशात हवामानाचा कृषी व्यवसायावर परिणाम होतो.

**हवामन :**

हवामान म्हणजे वातावरणातील अनके घटकांच्या विशिष्ट ठिकाणी सर्वसाधारण कालावधीत एकत्रित दिसून येणाऱ्या परिणामाला 'हवामान' असे संबोधले जाते. यामध्ये तापमान, आर्द्रता, सूर्यप्रकाश, पाऊस, वारा इत्यादी घटकांचा इतर घटकांवरील परिणाम व त्यासर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे होणारे बदल वेगवेगळया नैसर्गिक आपत्तींना आमंत्रण देणारे ठरले. यातील काही आपत्तींचा अनुभव आपण घेत असतो. परंतु ठोस रुपाने या आपत्ती अमूक कारणाने होतात. याविषयीची जागृती अजून व्हायची आहे. उदा. कमी कालावधीत खूप पाऊस पडणे किंवा ढगफुटी होणे, जोराची वादळे निर्माण होणे, तापमानात प्रचंड वाढ होणे, अतिशय थंडी पडणे इत्यादी.

हवामान बदल म्हणजे काय? रंजन केळकर यांच्या मते, 'हवामानातील बदल जेव्हा आपल्या अपेक्षेप्रमाणे होत राहतो. तेव्हा आपण त्याविषयी अधिक विचार करत ाही पण ज्या प्रकारच्या हवामानाची आपल्याला सवय नसते. तसे हवामान जेव्हा आपण अनुभवू लागतो अशावेळी त्यास 'हवामानातील बदल'असे म्हटले जाते. सामान्यतः "पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सरासरी तापमानात हळुहळु पण सतत होणारी वाढ जी काही प्रमाणात वातावरणातील हरितगृह वायूंच्या एकूण प्रमाणात होणाऱ्या वाढीमुळे होते. यालाच वैश्विक तापमान वाढ म्हणजेच हवामान बदल असे म्हणतात.'

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. हवामान बदलाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर परिणाम अभ्यासणे.
३. हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

**शोध निबंधाची गृहितके :**

१. जागतिक स्तरावर हवामानात बदल होत आहे.
२. भारतीय शेती ही पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रावर हवामान बदलाचा प्रतिकुल परिणाम होत आहे.

**संशोधन पध्दती** :

हवामान बदलाचे भारतीय कृषीवरील परिणाम अभ्यासण्यासाठी प्रामुख्याने इंटरनेट, साप्ताहिक, मासिके, विषयाशी संबंधित अभ्यास, संदर्भ ग्रंथ यासारख्या द्वितीय साधनाचा आधार घेण्यात आलेला आहे.

**हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम :**

हवामानाच्या कृषी क्षेत्रावर परिणाम होतोच हे वास्तविक सत्य आहे. हवामान बदलाचा कृषी उत्पादनावर प्रत्यक्ष परिणाम पडतो तर अप्रत्यक्ष परिणाम शेतकरी वर्गावर आणि उत्पन्नावर व अन्नधानच्या वाढत्या किंमतीवर पडतो. त्यामुळे अन्नासारखी गंभीर समस्या निर्माण होते. तापमानात वाढ झाली तरी हिमशिखरे वितळून समुद्राची पाणी पातळी वाढते. समुद्राची पाणी पातळी वाढल्यामुळे काठावरील जमीन पाण्याखाली जाते व जमिनीचे क्षेत्र घटते. म्हणून अन्नधान्याच्या उत्पादनात घट होते.

हवामान बदलाचा अन्नधान्य व फळ पिकांवर देखील विपरित परिणाम होतो. तापमानात वाढ झाली तर गहू, तांदूळ या पिकांवर विपरित परिणाम होतो. तसेच धान्याचा व फळपिकांचा आकार लहान होऊन उत्पादन घटते. दमट हवामानामुळे पिकांवर किड व रोगांचा प्रादुर्भाव होतो. वनस्पतीच्या पृष्ठभागावरील प्रकाशाची तीव्रता, आद्रता, तापमान असे घटक वनस्पतीच्या वाढीसाठी परिणाम दाखवत नाही. हवामानातील दमट वातावरणामुळे किटकाच्या प्रजनन क्षमतेत वाढ होते. त्यामुळे किटकनाशकांचा अधिक वापर करावा लागतो. अधिक वापरामुहे पिके किटकनाशकाला प्रतिसाद देत नाहीत. परिणामी पिक करपते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्च वाढतो. यामध्ये दुष्काळ, पूर, कमी कालावधीत जोराचा पाऊस, वादळे इत्यादींचा समावे होतो आणि या सर्वांमुहे खालील प्रकारचे परिणाम दिसून येतात.

- अन्नधान्य उत्पादन कमी
- निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे पिक तयार होण्याच्या कालावधीमध्ये बदल.
- कृषी उत्पादनाची प्रत खालावते.
- जमिनीवरील मातीचे वहन.
- मिनीच्या सुपिकतेवर विपरीत परिणाम.
- पिकांवर किड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.
- कदाचित भविष्यात हंगामांच्या तारखा बदलाव्या लागतील.

भारतातील लहान ते मध्यम शेतकऱ्यांना याचा फटका जास्त बसणार आहे. कारण भारतीय शेती ही पावसावर अवलंबून १आहे आणि त्यामुळे हवामान बदलातील परिणाम हा तीव्रतेने जाणवणार आहे. त्यामुळे हवामान बदलाची झळ अशाप्रकारे सर्वसामान्य शेतकऱ्यांना जास्त भासू शकते.

**हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी उपाय :**

देशातील ७० टक्के लोक शेतकरी आहेत. त्यांना नैसर्गिकआपत्तीत बसणाऱ्या चटक्यांची मंदीच्या काळातील फटक्यांची झशळ बसते. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शासनाने काही उपाय सुचविले आहेत. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जणजागृती आवश्यक आहे व त्यासाठी आपणास खालील उपाय योजना येतील.

१. शेती व्यवसायावर अचानक येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती माहिती गोळा करुन तिचे नियोजन करणे गरजेचे आहे.
२. शेतकऱ्यांना शेती संबंधित तंत्रज्ञानाचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन हवामान बदलानुसार शेतीमध्ये नियोजनात्मक बदल करतील.
३. हवामानातील बदलाचा शेतीवरील परिणाम कमी करण्यासाठी सेंद्रिय शेती पध्दतीवर जास्त भर देणे गरजेचे आहे.
४. हवामान बदलामुळे नुकसान झाल्यास पीक विमा दिला तरच शेतकऱ्यांना भवितव्य घडवू शकते.
५. पाणी साठवून, पाणी आडवा, पाणी जिरवा, छोटे तळे बांधण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे या योजनासाठी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे.
६. अवकाळी पाऊस, गारपीट यापासून फळबाग इतर पिकांचे संरक्षण करण्याकरिता किमान आठ दिवस अगोदर हवामानाचा अचूक अंदाज प्रसारित करावा.
७. डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी २००७ मध्ये 'राष्ट्रीय कृषी आयोगाच्या अहवालात पेरणीपासून बाजारपेठेपर्यंत शेती समोरीत सर्व संकटांचा विचार करुन 'कृती आराखडा' दिला होता. तो अहवाल केवळ कागदावरच भार ठरु नये याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

८. सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गावर मात करण्यापेखा निसर्ग नियमांचा अवलंब करुन शेती व्यवसाय केल्यास उत्पादनात तर वाढ होईल पण प्रदुषणमुक्त पर्यावरण निर्माण होण्यास देखील मदत होईल.

हवामानातील बदलामुळे होणाऱ्या परिणमांचा अनुभव आपण सध्या घेतोय आणि भविष्याचा विचार केला तर भावी पिढीसाठी आत्ताच सकारात्मक प्रयत्न झाले पाहिजेत तर आणि तरच पुढच्या पिढीला हा बदल दिसून येईल.

**निष्कर्ष :**

आपल्या सभोवतालचे वातावरण सतत बदलत असल्यामुळे हवामानात बदल होतो आणि बदलल्या हवामानाचा कृषी क्षेत्रावर परिणाम होतो. शेती ही हवामानावर आधारित आहे. चांगले हवामान असेल तर पीक चांगले येऊन उत्पन्नात वाढ होते. प्रतिकूल हवामानामूळे मात्र शेतीव्यवसायावर वाईट परिणाम होतो. आता बदलत्या परिस्थितीशी शेतकऱ्यांना सक्षम करण्याकरिता हवामान बदलाची तीव्रता कमी करण्यासाठी शेतीमध्ये विविध प्रकारचे संशोधन वाढविणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ :**

१. भिसे व्ही.बी. (२००९), 'हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम', लेख अर्थसंवाद, मार्च २००९, खंड ३२, अंक७.
२. कानोडे संजय (२०१०), 'जागतिक तापमान वाढीचा भारतीय कृषी उत्पादनावरील परिणाम', लेख, शेतकरी मासिक, ऑक्टोबर पृ. ४४.
३. डॉ.विजय कविमंडन (२००७). 'कृषी अर्थशास्त्र', श्री.मंगेश प्रकाश वैजापूर,
४. डॉ.प्रदिप अ.गोंजारी (२०१७). 'हवामनातील बदलाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम', लेख, कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर.
५. सवदी ए.बी. (जाने. २०१९). 'भूगेल व पर्यावरण', निराली प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती.

International Journal of Multidisciplinary Research and Technology
ISSN 2582-7359, Peer Reviewed Journal, Impact Factor 6.325
www.ijmrtjournal.com

# पर्यावरण समस्या

***डॉ.तांदळे एस.एस.***
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला महाविद्यालय नांदुर घाट

**प्रस्तावना :**

मानवी जीवनात पर्यावरणाला अनन्य साधारण महत्व आहे. हवा, पाणी, जमीन, वनस्पती, पशुपक्षी, कीटक, मानव हे सर्व मिळुन पर्यावरण बनत असते. आपल्या भोवतालची प्रत्येक गोष्टी पक्षी, प्राणी, डोंगर, जंगल, शेती, नदीनाले, समुद्र, हे सर्व आपण पाहत असतो. पर्यावरणात मानवाचे महत्वाचे स्थान आहे. बुध्दीच्या जोरावर तो पर्यावरण संकल्यपनेत महत्वाची भुमीका बजावत असतो. त्याचा उपयोग किंवा दुरउपयोग करणे हे त्याच्याच हाती असल्याने तो पर्यावरणाच्या केंद्रस्थानी आहे. मानवाचा विकास शिकारी ते शेतकरी असा होत गेला. जिवन अधिकाधीक सुखी व संपन्न करण्यासाठी त्याने बुध्दीचा वापर केला. अनेक वैज्ञानीक शोध लावले. जंगले तोडून शेत जमीन तयार केल्या. मोठी धरणे बांधण्यात आली. त्यामुळे पर्यावरणातील जंगले पाण्याखाली गेली.

औद्योगीक क्रांती नंतर इंधनाची गरज मानवाला भासु लागली. त्यामुळे इंधन विहीरी खोल खोदाव्या लागल्या, सोण्याच्या खाणी, दगडी कोळसा खाणी, अशा अनेक खाणीसाठी वनसंवदा नष्ट करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून नैसर्गीक साधनसंपत्तीची टंचाई भासु लागली. कारखाण्यातील प्रदुषनामुळे हवा, पाणी यामध्ये प्रदुषण होवू लागले. याचा परिणाम नदीतील पाण्यावर होवून पाणी दुशीत होवु लागले. प्रदुषणामुळे जगात अनेक समसया निर्माण झाल्या. पर्यावरणाची समस्या हि स्थानिक वा एखाद्या देशापुरती समस्या नसुन ती जागतीक समस्या बनली आहे.

**संशोधनाचा उद्देश :**

पर्यावरण समस्याचा अभ्यास करत असतांना संशोधणनाचे काही उद्देश निश्चित करावे लागतात त्याशिवाय संशोधन कार्य करता येत नाही. त्यामुळे संशोधनासाठी काही उद्देश निश्चित केलेले आहेत. ते आपणास पुढील प्रमाणे सांगत येतील.

१. पर्यावरण समस्याचा अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देश आहे.
२. भारतीतील पर्यावरण समस्येचा अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

**संशोधनाची ग्रहीतके :**

सामाजिक संशोधनामध्ये ग्रहीतके महत्वाची असतात. ग्रहीतकाशीवाय संशोधन कार्य पुर्ण होवू शकत नाही. संशोधनासाठी ग्रहीतक नसेल तर हे संशोधन समुद्रात भरकटलेल्या जहाजा सारखे होईल बोगार्डस यांच्या मते परिक्षण केल्या जाणाऱ्या विधानास ग्रहीतकृत्ये असे म्हणतात. संशोधनात एखादी समस्या निर्धारणाचे कार्य निश्चित झाले की, निर्धारित समस्येची उत्तरे विधानाच्या स्वरुपात मांडण्याच्या कार्याकडे संशोधकाने वळणे उपयुक्त ठरते.

खालील ग्रहीतकृत्याच्या आधारे आपणास संशोधन कार्य करता येईल.

१. औद्योगीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.
२. शहरी करणामुळे नदीमध्ये दुशीत पाणी सोडत जात आहे.

**तथ्यसंकलन :**

संशोधन कार्यामध्ये तथ्य संकलन महत्तवाचे असतात. तथ्य संकलनाचे दोन प्रकार आहेत. प्राथमिक स्त्रोत आणि द्वितीयक स्त्रोत प्राथमिक स्त्रोतात प्रश्नावली, मुलाखत निरीक्षण, मुलाखत अनुसुची येतात. तर द्वितीयक स्त्रोतात पुस्तके, लेख हस्तलिखित साधने, सांख्यीकी ग्रंथ, पत्रे, दैनंदिनी इत्यादी येतात. या संशोधनात आपण द्वितीयक स्त्रोताचा वापर करुन संशोधन करणार आहेत.

**भारतातील पर्यावरण कायक्रम :**

युनेस्कोच्या अंतर्गत संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम कमीटीची स्थापना झाली. कमीटी स्थापणे वेळी पन्नास देश सदस्य होते. भारतत १९७२ पासुन पर्यावरण क्षेत्रात योजना बध्द्व कार्यक्रम सुरु झाला. देशाच्या पर्यावरण संबंधी विचार विनीमय करण्यासाठी NCEPC या समीतीची

स्थापना झाली. त्याच प्रमाणे औद्योगीक प्रदुषणला प्रतीबंध करण्यासाठी केंद्रीय व राज्यस्तरीय प्रदुषण मंडळात स्थापना करण्यात आली. या पर्यावरणीय व्यवस्थाची अनिवार्यता लक्षात घेवुन या कमिटीने काही सुचना मांडल्या.

१. औद्योगीक प्रदुषणाचे नियंत्रण
२. नष्ट होत चाललेल्या वनस्पती व प्राण्याच्या प्रजातीचे संरक्षण
३. पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा आणि किमान स्वच्छता आरोग्य व्यवस्था
४. देशातील जमीनी, पाणी आणि वनस्पती या नैसर्गिक संसाधनाचे सरंक्षण आणि योग्य व्यवस्थापन

१९८३ मध्ये राष्ट्रीय पातळीवर दोन विशेष कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली.

१. गंगा शुद्वीकरण प्रकल्प
२. देशभर वृक्षारोपण मोहिमा

अशा प्रकारे गावागावातुन स्वच्छता मोहिम, प्रदुषण नियंत्रण मोहिम तसेच वृक्षारोपणाच्या कार्यांचा आरंभ करण्यात आला.

**भारतीय पर्यावरण विषयक आंदोलने :-**

भारतामध्ये पर्यावरण विषयक अनेक आंदोलने झालेली आपणास पहावयास मिळतात. या प्रामुख्याने चिपको आंदोलन प्रामुख्याने सांगता येईल. झाडांना वाचवण्यासाठी व वृक्षतोडीचा विरोध करण्यासाठी हजारो स्त्रीया आणि पुरुषांनी यात सहभाग घेतला. एप्रिल १९७३ मध्ये अलकनंदा खोऱ्यातील मंडल गावात या आंदोलनाची सुरुवात झाली. सुंदरलाल बहुगुणा या आंदोलनाचे प्रणेते होते तसेच गडवालची गौरी देवी यांनही पर्यावरण वाचण्यासाठी आंदोलनात सहभाग घेतला. किकरी देवी यांनी पर्यावरणासाठी आंदोलन केले. कर्नाटकातील हुळीकळ गावातल्या थिम्मक्काले वडाच्या झाडाची लागवड केली. तसेच मेघा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन केले.

**निष्कर्ष :-**

पर्यावरण समस्याचा अभ्यास करतांना काही निष्कर्ष आपणास सांगता येते.

१. शहरीकरणामुळे जंगल तोडीचे प्रमाण वाढत आहे हे दिसुन येते.
२. औद्योगीककरणामुळे दुषीत सांडपाण्याचे पर्यावरणाचे नुकसान होत आहे.
३. दुषित पाण्यामुळे शेती नापीक होत आहे.

**संदर्भ :-**

१. सामाजिक ज्ञान व सामाजिक जाणीव अधिष्ठान अभ्यासक्रम - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक
२. सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. दा.धो.काचाळे
३. सामाजिक संशोधान पध्दती - डॉ. प्रदिप आगलावे
४. आरोग्यदायी पर्यावरण - भुषण पटवर्धन
५. पर्यावरण अध्ययन - गुर्जन आणि जाट

International Journal of Multidisciplinary Research and Technology
ISSN 2582-7359, Peer Reviewed Journal, Impact Factor 6.325
www.ijmrtjournal.com

# भारतीय सिनेमा व हवामानातील बदल

## (Indian Cinema & Climate Change)

***डॉ. राधाकृष्ण एल. जोशी***
श्रीमती एस.के. गांधी कला, अमोलक विज्ञान व
पी.एच.गांधी वाणिज्य महाविद्यालय, कडा जि.बीड

***मनोज ब. देवकर***
इतिहास विभागप्रमुख
राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, करमाड ता.जि.छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना :**

वैश्विक तापमानात होत असलेली वाढ ही मागील काही वर्षांमध्ये मानवापुढे निर्माण झालेली सर्वात मोठी समस्या होय. या वाढत्या तापमानामुळे आपण सतत चक्रीवादळ, पुर, जंगलातील आग, दुष्काळ व उष्णतेच्या लाटा यामध्ये अडकलो आहोत. त्यामुळे साहजिकच मानवाबरोबरच इतर प्रजातीवर देखील बदलाचे दुष्परिणाम दिसून येत आहेत.

जागतिक तापमानातील वाढ होण्यासाठी बहुसंख्य राष्ट्रे त्यांचे धोरण, असुरक्षिततेची भिमी कारणीभूत ठरते. त्याचबरोबर कार्बनडाय ऑक्साईड व मिथेन सारखे वायू पृथ्वीच्या वातावरणात सुर्याची उष्णता अडकवतात हे वायू वाहने, कारखाने, वृक्षतोड, इंधन या मानवी कृतीमुळे देखील वातावरणात सोडले जातात.

**हवामान बदलाची व्याप्ती :**

२१ व्या शतकात वातावरण बदलाची व्याप्ती निश्चितच व्यापक स्वरुपात दिसून येते. मानवी आरोग्यावर होणारे व्यापक परिणाम वातावरण हवामान बदलाशी मोठ्या प्रमाणावर जोडलेले आहेत. हवामानातील बदलामुळे समुद्रपातळी, वनस्पतीचे जीवन तसेच मोठ्या प्रमाणावर दुर्मीळ प्रजाती विलुप्त होत आहेत. मानवी क्रियाकलापामध्ये हवामान बदलाची मोठी क्षमता आहे. म्हणूनच हवामान बदल हा शब्द मानववंश हवामान बदलासाठी वापरला जातो. मानवी कृतीमुळे हवामान बदल घडतात. त्यामुळे या बदलाची व्याप्ती मानवाचा संबंध असलेल्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत आहे. सिनेमा उद्योग हा त्यापैकीच एक. भारतीय सिनेमा उद्योगाने आता कुठे हवामान बदलाची दखल घेतल्याचे दिसून येते.

**भारतीय सिनेमा आणि हवामानातील बदल :**

मागील काही वर्षात भारतीय सिनेमाने वेगवेगळ्या हवामानातील बदलाचे धोके आपणास दाखविण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात. भारतीय सिनेमाची सुरुवात १९१३ मध्ये आलेल्या राजा हरिश्चंद्र पासून झाल्याचे मानले जाते. महाराष्ट्र ही भारतीय सिनेमाची जननी समजली जाते. १९१३ नंतरच्या दशकात तत्कालीन कलकत्ता, मद्रास सारख्या शहरांमध्ये सिनेमा निर्माण होऊ लागला व पुढे कालांतराने सिनेमाचे रुपांतर उद्योगात झाले.

प्रारंभीच्या काळात पौराणिक, धार्मिक विषयांना चित्रपट निर्मितीत प्राधान्य दिले. हळुहळु सामाजिक, ऐतिहासिक विषय भारतीय सिनेमाने हाताळले परंतु प्रेक्षकांचे मनोरंजन हाच भारतीय सिनेमाचा प्रमुख उद्देश असल्याचे मागील शतकात दिसून येते. परंतु चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, ते मनाला स्पर्श करणारे, संदेश देणारे सामाजिक बदल घडवणारे असतात. २१ व्या शतकात ग्लोबन वार्मिंगचे धोके भारतीय सिनेमाने काही प्रमाणात लक्षात घेतले व जाहीरात, लघुपट, पूर्ण लांबीचा चित्रपट, इ. माध्यमातून हवामान बदल व त्याचा मानवावरील दुष्परिणाम सारखा विषय हाताळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**कडवी हवा (२०१७) :** नीला माधव पांडा यांनी जाहीरात, लघुपट, डॉक्युमेंटरीच्या माध्यमातून अनेक सामाजिक विषय हाताळलेले आहेत. बालमजूर, शिक्षण, पाणी समस्या या सोबतच त्यांनी हवामानातील बदल हा विषय हाताळलेला आहे. त्यांनी २०१७ मध्ये कडवी हवा या चित्रपटाच्या माध्यमातून बुंदेलखंड भागातील दुष्काळावर व उडिसाचा किनारी प्रदेश व चंबल मधून नष्ट होणाऱ्या खेडेगावांवर प्रकाश टाकला. चित्रपटाची निर्मिती नीला पांडा, मनिष मुद्रा, अक्षय पारिजा यांनी केलेली होती. चित्रपटात संजय मिश्रा, रणबीर शोरी, एकता सावंत, तानिया, श्रीकांत वर्मा यांच्या प्रमुख भूमिका होत्या. नितीन दिक्षीत यांनी कथा, पटकथा लिहिली होती. ०७ एप्रिल २०१७ रोजी पार पडलेल्या ६४ व्या

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये विशेष चित्रपट म्हणून गौरविण्यात आले. वातावरणातील बदलावर खऱ्या अर्थाने प्रकाश टाकणारा हा पहिलाच चित्रपट म्हणावा लागेल.

**कांतारा (२०२२) :** मुळचा कन्नड भाषेतील हा चित्रपट देशभरात प्रचंड गाजला. कांतारा म्हणजे घनदाट किंवा रहस्यमयी जंगल. जंगलातील देवतेला कन्नड भाषेत कांतारे म्हटले जात. कर्नाटकात वनदेवतेचे महत्व खुप आहे. ऋषभ शेट्टी यांनी मुख्य भूमिका व चित्रपटाचे दिग्दर्शन केले.

हा चित्रपट परमात्याला मानणाऱ्यांच्या भावनांशी जोडलेला आहे. या चित्रपटात पांजुर्ली देवता कांताराच्या रुपात दाखवलेली आहे. ती जंगलाचे व तिथे राहणाऱ्या माणसांचे रक्षण करते. पर्यावरण संतुलनासाठी जंगलाचे महत्व किती आहे हे सांगण्याची गरज नाही. शासन देखील वृक्षलागवड मोहीम मोठ्या स्तरावर राबवत असते. वने नष्ट होत गेल्यामुळे हवामानातील बदलावर त्याचा मोठा विपरीत परिणाम झ ालेला दिसतो.

**भूमिका (२०२१) :** OTT या प्लॅटफॉर्मवर कोव्हीड-१९ काळात हा चित्रपट आला. कडवी हवाच्या अगदी भिन्न असा हा भीतीदायक श्रेणीतला चित्रपट. मुळ तामिळ भाषेत हा चित्रपट होता. रथीन्द्रन प्रसाद यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात ऐश्वर्या राजेश, अवंतिका, माधूरी जैन, विधू, पवेल यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. कार्तिक सुब्बाराज यांनी या चित्रपटाची निर्मिती केलेली होती. चित्रपटात बदला घेणारी नायिका भूमिका व पृथ्वी या दोन्ही सारख्याच आहेत. त्या अत्याचार झाल्यावर बदला घेणारच. पृथ्वीचे संतुलन जो कोणी बिघडवण्याचा प्रयत्त्न करेल, पृथ्वी अपवित्र करण्याचा प्रयत्न करेल त्यास शिक्षा मिळणारच असा चित्रपटाचा आशय होता.

**The City of Mumbai (२०१७) :** ही एक पाच मिनिटाची जाहीरात स्वरुपातील फिल्म २०१७ मध्ये प्रदर्शित झाली होती. काही पर्यटक एका बोटीत बसून समुद्राच्या मध्यभागी येतात. पाण्याखाली असलेल्या एका प्रसिद्ध पण आता लोप पावलेल्या शहराबद्दल ते चर्चा करतात.मानव जोपर्यंत एखादी गोष्ट नष्ट होत नाही तोपर्यंत त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. मानवाने निसर्गाला असेच ओरबाडले. त्याचाच परिणाम म्हणून शेवटी हे प्रसिद्ध शहर पाण्याखाली गेले असे यामधून दाखविण्यात आले होते.

**शेर दिल (२०२२) :** अत्यंत कमी बजेटमध्ये बनवण्यात आलेला व OTT प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित या चित्रपटातून गरज विरुद्ध लालसा यांचा संघर्ष साध्या कथानकातून प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न झाला.

**कादान (२०२१) :** मुळ तामिळ भाषेत प्रदर्शित हा भारतीय चित्रपट तलगु व हिंदीतही प्रदर्शित असा साहसप्रधान चित्रपट आहे. प्रभू सोलोमन यांनी याचे लेखन व दिग्दर्शन केले. राणा दुग्गुपती, विष्णू विशाल, श्रीया पिळगावकर, झोया हुसेन यांनी काम केले. हिंदीत पुंडलिक सम्राट याने मुख्य भूमिका साकारली. मानव व प्राणी विशेषतः हत्ती यांच्यातील खोलवर रुजलेले भावनिक नाते या चित्रपटातून मांडण्यात आले. निसर्गाचे सौंदर्य या चित्रपटातून नायकाचा प्रयत्न चित्रपट यशस्वी झालेला असला तरी प्रत्यक्षात वन्यजीवामधील सर्वात मोठा प्राणी आज मोठ्या प्रमाणावर दुलक्षित आहे.

**सारांश :**

भारतीय सिनेमाने बदलत्या हवमानाच्या संदर्भात एकत्रितपणे केलेला प्रयत्नाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, अजुनही आम्ही मुख्य प्रवाहाच्या बाहेर येऊन अशा प्रकारचे संवेदनशील विषय हाताळून लोकांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न करत नाहीत.

**संदर्भ :**

१) प्रा. एस.बी.सवदी, भूगोल व पर्यावरण, निराली प्रकाशन, पुणे.
२) Infoin.marathi.in
३) Maharashtra Birthplace of Indian Film Industry by Isak Mujavar.
४) www.the betterindia.com
५) http//corporatecitizen.in
६) www.financialexpress.com

International Journal of Multidisciplinary Research and Technology
ISSN 2582-7359, Peer Reviewed Journal, Impact Factor 6.325
www.ijmrtjournal.com

# अहमदनगर जिल्हातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीचा एक भौगोलिक अभ्यास

*शिवाजी नवनाथ हुलुले*
भूगोल विभाग, कला
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राहुरी

*डॉ. संजय महादेव शिंदे*
भूगोल विभाग, श्रीमती एस्. के. गांधी, आर्टस्
अमोलक सायन्स ॲण्ड पी एच गांधी कॉमर्स कॉलेज, कडा

**१ प्रस्तावना -**

शेती ही फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे. तिचा उगम आदिमानवाच्या विचारातून झाला. भारतात जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात शेती करतात. आपल्या भारतात पूर्वी पासून सखोल शेती केली जाते म्हणून भारताला कृषीप्रधान देश म्हटले जाते. मान्सुनवर आधारित शेती ही एक नैसर्गीक जीवनपध्दती आहे . शेती करणारा शेतकरी हा ग्रामव्यवस्था आणि कृषी समाजरचनेचा कणा आहे. सर्व शेतकरी रात्रंदिवस काबाड कष्ट करून अन्न-धान्य पिकवतात. भारतातील अर्थव्यवस्था देखील शेती उद्योगावर अवलंबून आहे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टीमध्ये शेती करताना येणारा खर्च पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा {भांडवल} आणि शेवटी जेथे तो त्याचा उत्पादीत शेतमाल विकतो, ती बाजारपेठ शेतकऱ्यासाठी त्याची शेतीच सर्वकाही असते. त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि जगातील अन्य उद्योग करणारे लोक हे कळत-नकळत या शेतीवर अवलंबून असतात. शेती करताना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावाची होणारी घसरण शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक इत्यादीकडून घेतलेले कर्ज परतफेडीसाठीची मुदत, निर्यातीतील होणारे शासकीय बदल अशा अनेक येणाऱ्या संकटांचा सामना शेतक-याला करावा लागतो. हवामानातील अचानक होणा-या बदलामुळे शेती पिकाचे नुकसान होते. हजारो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो पण त्याच्या कष्टाला दरवेळी फळ मिळेलच असे नाही. त्यामुळे शेतक-यांसमोर आर्थिक समस्या निर्माण होते.

जगातील कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही त्या देशाच्या कृषी क्षेत्रावर झालेली दिसून येते. भारतातील लोकांचा मुख्य व्यावसाय शेती आहे. आपल्या भारतातील ७० टक्के लोक हे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. स्वातंत्र्यानंतर तर देशात औद्योगिकक्षेत्राला प्राधान्य मिळत आले. ७० टक्के जनसंख्या शेती क्षेत्रावर प्रत्यक्षात व अप्रत्यक्षात संबंधित असली तरी औद्योगिकीकरणाला पर्याय नाही. या विचाराच्या जोरावर शेतीकडे गेली पन्नास वर्षे सरकारचे दुर्लक्ष झाले. शेती उद्योगात काम करणा-यांनी हा पक्षपात स्विकार करून दारिद्र्याचा प्रवास यापुढेही चालू ठेवावा का? गेल्या ३०-३५ वर्षात शेतकऱ्याचे अनेक प्रश्न चर्चेला यायला लागले. त्याची १९९७ च्या सुमारास जरी महाराष्ट्रात सुरुवात झाली असली तरी त्या प्रश्नांना आता देशातील अनेक व्यासपीठातील भाषणात जागा मिळू लागली आहे. परंतु शेतक-यांच्या अनेक मुलभूत प्रश्नांवर अजूनही कायमचा उपाय शोधला जात नाही किंवा तो समजला असला तरी तो उपाय अनेक राजकीय पक्षांना व त्याच्या नेत्याना अडचणीत टाकणारच असण्याची शक्यता अधिक आहे. आपल्या देशाला १९४७ साली इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता आपलेच राज्यकर्ते देशवासियांच्या सर्वांगिण विकासासाठी अनेकफायदे व सुविधा पुरवून देशाचा कारभार चालवतील अशी अंपेक्षा होती. अशी अपेक्षा ठेवणे गैर होणार नाही. राज्यकर्ते शिकलेले व अनेकक्षेत्रातील अनुभव असलेले असल्याने ते स्वतःहून अशा अपेक्षा पूर्ण करतील अशी भाबडी समजूत होती. या अज्ञानाचा गैरफायदा अनेक नेत्यांनी घेवून आपले खिसे भरून घेतले. सावकार व सरकारी कर्मचारी यात सर्वात पुढे होते. अनेकांच्या जमिनी हडप झाल्या, अनेकांना स्वतःच्या पूर्वजांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी आयुष्यभर मेहनत करावी लागली. त्यात एकपिढी हातात काहीही न पडता संपली. कुटुंबाला दोन वेळेचे जेवण मिळते व घरातील उत्सव थोडा पैशात का होईना करता येतात यातच त्यांचे समाधान होते.

शेती आर्थिकदृष्ट्या परवडते किंवा नाही, त्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवणे शक्य नव्हते. सामान्यपणे आपले नाही तर आपल्या मुलाबाळांचे आयुष्य सुखात जाईल या आशेवर राहून त्यांनी या जगाचा निरोप घेतला. सुरुवातीला शेती व्यवसाय स्वतःच्या कुटुंबाचा जीवनाधार म्हणून समजला जात होता परंतु स्वातंत्र्योत्तर काळात हळूहळू देशात औद्योगिकीकरणाचा पाया मजबूत होऊलागला होता, खाजगी क्षेत्रातील काही उद्योगपतींच्या सहकार्याने देशात औद्योगिकरणाचे जाळे पसरुलागले बहुतेक उद्योगासाठी शेतीत तयार होणारा माल {कापूस, ताग, गहू, तादूळ, डाळी, फळे वगैरे} कच्चा माल म्हणून वापरला जात असे व त्यापासून तयार होणाऱ्या वस्तुंचा मोठा ग्राहकम्हणून शेतक-यांची संख्या हळूहळू वाढायला लागली. उद्योगावर अंवलबून राहून शेती करण्याचा प्रकार सर्वसामान्य व्हावयास लागला जसे उद्योगातील वस्तुंचे प्रमाण शेतकऱ्याच्या जीवनात होणाऱ्या उत्पादनाचा खर्च हळूहळू वाढू लागला. कालांतराने यात लोखंडी अवजारे, नांगर, रसायने, रासायनिकखते, बियाणे, विज व विजेवर चालणारी इतर यंत्रे व वस्तु इत्यादींचा मोठ्या प्रमाणात समावेश होऊ लागल्याने शेतमालाचा उत्पादन खर्च सतत वाढत होता व आजही वाढत आहे त्याप्रमाणे कर्जाचा भार इतका वाढू लागला की, साधी बियाणे घेण्यासाठी सुध्दा कर्ज घेण्याची वेळ

शेतक-यावर आली आहे. कर्जबाजारीपणा वाढीस लागून त्यातून अनेकांनी आत्महत्या केल्याचे आपणांस मागील दहा पंधरा वर्षांत विविध वृत्तपत्रे, टिव्ही न्युजवरून आढळून येत आहे.

ही तर अतिश लाजीरवाणी बाब म्हणावी लागेल. इतके असूनही देशातील प्रसिध्दी माध्यमे, राजकीय पक्ष व त्या काळचे नेते यांच्यात त्याबाबतची संवेदनशीलता अजिबात दिसून आली नाही म्हणून संशोधकाने शेतक-याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करून त्याचे जीवनमान कसे उंचावता येईल यासाठी प्रयत्न केला आहे. अहमदनगर जिल्हातील राहुरी, राहता, नगर, पाथर्डी या तालुक्यातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीशी निगडीत आहे. प्रस्तुत विषयावर आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे संशोधन झाल्याचे आढळत नाही.

## २ उद्दिष्टये -

१ शेतक-यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे

२ शेतक-यांच्या धारण क्षेत्राचा अभ्यास करणे

३ शेतक-यांच्या जमीनीची उत्पादकता याचा अभ्यास करणे.

४ शेतक-यांच्या शेती व्यवसायातील उत्पादन व खर्चाचा अभ्यास करणे

५ शेतक-यांच्या आर्थिक प्रश्नाचा अभ्यास करून त्यावर उपायायोजना सुचविणे.

६ शेतक-याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध उपाययोजनांची जाणीव करून देणे.

७ शेतक-यांसाठी शासनातर्फ राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे

## ३. महत्व -

आजच्या जागतिकीकरण ,खाजगीकरण,उदारीकरण माहिती तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात भारतात औद्यगिक व सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी भरपूर प्रयत्न चालू आहेत. कारण शेतीमधील उत्पादकतेत वाढ होण्यासाठी व जलद आर्थिक विकास साधण्याकरीता शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागातील शेतक-याची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. त्याच्या शेतीवर आधारित उद्योगधंदे गावामध्ये उपलब्ध करून दिले पाहिजेत. प्रत्यक्षात या सर्व गोष्टींचा अभाव जाणवतो. अजुनही ग्रामीण भागातील शेतकरी उपेक्षित जीवन जगत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास व्हावा हा उद्देश्य डोळयासमोर ठेवून या विषयीची संशोधकाने निवड केली.

शेतकऱ्यासाठी शासकीय योजना असून सुध्दा शेतक-याच्या आर्थिक परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही. देशात होणाऱ्या प्रगतीचा शेतकऱ्याच्या जीवनमानावर खरोखरच सकारात्मक परिणाम झाला का ? त्याच्या राहणीमानाचा दर्जा वाढला का ? कृषी मालाचा दर वाढला का ? कृषी विकासाचा दर वाढला आहे का ? तसेच या विविध कृषी योजनांची गावपातळीवर जावून सर्व शेतक-यांना त्याची माहीती आहे का ? त्या योजनांचा त्यांना खरोखर लाभ मिळतो काय ? या प्रश्नांसोबतच शेतक-याची इतर उत्पादनांची साधणे, त्यांचा एकूण खर्च व त्याची आर्थिकस्थिती सुधारावी म्हणून कोणती उपाय योजना करावी, याचा विचार होण्याच्या दृष्टिने शेतक-याचे आर्थिक स्थितीचे अध्ययन होणे आजच्या काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक साधन संपत्ती शेतीसाठी आधुनिक बि-बियाणांचा वापर, सिंचनाखाली शेती आणणे या दृष्टीकोनातून अहमदनगर जिल्हातील शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचा अंभ्यास करणे महत्वाचे वाटते.

१. शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पादन कसे वाढवावे हे त्यांना कळेल.

२. शासन अल्पभूधारक व गरीब शेतक-यांसाठी विविध योजनेअंतर्गत अनुदान देतात याची त्यांना माहिती होईल.

३. शेतक-यांसाठी राष्ट्रीयकृत व सहकारी बॅंकेमार्फत कमी व्याज दरामध्ये पीककर्ज व शेती कर्ज मिळते हे शेतक-यांना

४. माहिती होईल.

५. शेतक-यांनी पिकविलेला माल बाजारात विकताना व्यापा-यांकडून कशी फसवणूक होते, हे त्यांना कळेल.

**४ समस्या -**

१. **भांडवल -** भांडवलाची कमतरता ही कृषी समोरील सर्वात महत्वाची समस्या आहे अजूनही ग्रामीण भागात शेतकरी जास्त व्याजाने कर्ज घेऊन कर्जबाजारी होतात. शेतीसाठी बी-बियाणे, किटकनाशके, रासायनिकखते, मजूर, शेतीची अवजारे, जलसिंचन, वाहतूक खर्च यासाठी भांडवल उपलब्ध होऊ शकत नाही. बँकेकडून कर्ज वेळेवर न मिळणे. त्यात व्याजदर जास्त आकारणे, पर्यायाने शेतीच्या उत्पन्नात घट होते.

२. **वाहतूक सुविधांचा अभाव -** आजही भारतात अनेक ठिकाणी नाशवंत कृषी माल वाहून नेण्यासाठी पुरेशा वाहतूक सुविधा उपलब्ध नाही. बरेचसे कृषी क्षेत्र हे ग्रामीण भागात विखुरलेले आहे. डोंगर, नद्या, जंगले यामुळे रस्ते चांगले नाहीत. यामुळे ग्रामीण भागातील माल विक्रीसाठी बाजार पेठेत आणणे अंत्यत कठीण आहे म्हणून मालाला योग्य दर मिळत नाही.

३. **वाहतुकीचा खर्च -** शेतकऱ्याची शेती व बाजारपेठ यातील अंतर खूप असल्यामुळे व त्यात शेतीत मालाचे उत्पादन हे खूप कमी निघते. त्यामुळे शेतकऱ्याला तो माल बाजार पेठेपर्यंत आणण्यासाठी खूप वाहतूक खर्च येतो. त्यामुळे शेतकरी आपला माल कमी भावामध्ये जागेवर व्यापा-यांना विकून टाकतो. या ठिकाणी शेतकऱ्याचे खूप मोठे आर्थिक नुकसान होते.

४. **पिक संरक्षण -** भारतीय कृषीवर अनेकनैसर्गीकघटकांचा प्रभाव पडलेला आहे. प्राकृतिक घटकांचा प्रभाव जास्त असल्यामुळे पिकांची वाढ व उत्पादनाची शेतकऱ्याला खात्री नसते. त्यात पिकलेला माल बाजारात विक्रीसाठी आणला तर भावाची हमी नसते. अचानक कोसळणारे भाव शेतकऱ्याला हानिकारक असतात. अचानकयेणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे जे नुकसान होते त्यासाठी पिकविमा माहिती ऑनलाईन भरावी लागते. शेतकरी अशिक्षित असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी यापासून वंचित राहतात

५. **रासायनिक खतांचा वापर -** पिकांच्या वाढीसाठी खताची आवश्यकता असते. शेतीस हव्या त्या प्रमाणात शेणखताची उपलब्धता होत नाही. अशावेळेस रासायनिकखते वापरणे गरजेचे असते. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे ते रासायनिक खतांचा वापर करू शकत नाही. परिणामी शेतीच्या उत्पादनात घट होते.

६. **विपणन -** उत्पादकापासून ते ग्राहकांपर्यंत वस्तू ज्या प्रक्रियेतून पोहचवली जाते त्याला विपणन असे म्हणतात.कृषीमाल नाशवंत असल्यामुळे कृषी मालाचे उत्पादन झाले की ते विकल्याशिवाय शेतकऱ्यापुढे पर्याय नसतो. त्यातच आर्थिक स्थिती, भावातील घसरण, उत्पादन खर्च यामुळे शेतकरी कोणत्याही परिस्थितीत शेतमाल विपणन करतात. या प्रक्रियेत व्यापारी व दलालांची मोठी साखळी निर्माण होऊन शेतक-यापासून ग्राहकापर्यंत माल जाताना किंमत वाढून जाते परंतु शेतक-याच्या हातात किंमत पडत नाही.

**५. उपाययोजना -**

१. शेतक-यांनी शेतीतील मातीचे परीक्षण करून घेतले तर उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते.

२. शेतमालाला शासनाकडून निश्चित भाव दिला जावा.

३. शेतक-यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली तर खर्चामध्ये बचत होऊन उत्पन्न वाढू शकते.

४. सर्वच शेतक-यांना सरकारी व राष्ट्रीयकृत बँकेकडून ० टक्के व्याजदराने कर्जाची सुविधा उपलब्ध करून देणे.

५. शासनाने कृषी शिक्षणाची सुविधा मोफत सुरु करावी.

६. शासनाकडून शेतक-यांना वर्षाला ६ हजार रुपये दिले जातात. परंतु यामध्ये शेतकऱ्याचा खर्च देखील भागविला जात

७. नाही. त्यामुळे शासनाकडून वर्षाला १८ ते २० हजार पेन्शन म्हणून शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करावे.

८. शासनाकडून गावामध्ये वाहणाऱ्या नद्या, नाले, ओढे यावर बांध घालून पाणी साठविण्याची सोय करावी

९. शेतक-यांना कमी किमतीमध्ये बियाणे, किटकनाशके व रासायनिक खते शासनाकडून उपलब्ध करून द्यावे.

**अपेक्षित परिणाम -**

१. शेतकरी आधुनक पध्दतीने शेती करताना दिसून येवू शकतात.

२. शासनातर्फ शेतक-यांसाठी राबविलेल्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकते.

३. शेतकरी उत्पन्न व खर्चाचे योग्य नियोजन करू शकतात.

४. शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते.

५. शेतक-यांच्याशेतीच्या उत्पादनामध्ये पहिल्यापेक्षा अधिक वाढ होऊ शकते.

६. शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन पध्दतीने शेती करण्यास प्रेरीत होऊ शकतात.

**संदर्भग्रंथ सूची -**

१. गव्हाणे सतिश गणपतराव, {२०१२}, कृषी क्षेत्रातील पेचप्रसंग आणि शेतक-याच्या आत्महत्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद .

२. गायकवाड मुकंद {२०१२} जागतिकीकरणाच्या संदर्भात शेती आणि आपण कृषी ग्रंथ भांडार, १३८४, शुक्रवार पेठ, पुणे.

३. घारपुरे व्ही {१९९९}, पर्यावरण भूगोल शास्त्र, नागपूर, पिंपळापुर अॅण्ड कं पब्लिशर्स.

४. झेंडे गो. का. {२०१२}, सेंद्रिय शेती पध्दती एक चिंतन, अथर्व प्रिंट, नांदेड फाटा, पुणे

५. सवदी ए बी {२००८},भूगोलाची मुलतत्वे, पुणे, निराली प्रकाशन.

६. प्रतियोगिता दर्पण{२०१३}, सामान्य अध्ययन भूगोल, आगरा, उपकार प्रकाशन.

७. भिंताडे वि.रा. {२००७}, शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.

८. भांडारकर के. एम्.{२००५}, सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे, नित्यनुतन प्रकाशन.

९. कदम चा. प. (२००८), शैक्षणिक संख्याशास्त्र , पुणे, नित्यनुतन प्रकाशन.

# परकीय चलन बाजार

***डॉ. पाऊलबुद्धे अनुराधा रामभाऊ***
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मारुतरावजी घुले पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज
अहमदनगर

**गोषवारा :-**

परकीय चलन बाजार ही जगातील सर्वात मोठी आर्थिक बाजारपेठ आहे. आणि एका देशाच्या चलनामधील क्रिया कलमाचे मूल्य दुस-या देशाच्या चलनाचे मूल्य व्यापार करण्यासाठी वापरले जाते. विदेशी व्यापार बाजारामध्ये मुख्य चार प्रकार आहेत जसे की, १) कंपन्या आणि व्यक्ती २) भांडवल बाजार ३) हेजर ४ ) सट्टेबाज बाजार इ. तसेच विविध सिद्धांताशी संबंधित कंपन्याने व्यक्तीच्या वस्तू आणि सेवांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील संबंध पुरवठा आणि एक्सचेंज ची मागणी सिद्धांत, खरेदी शक्ती समता, आंतरराष्ट्रीय फिशर प्रभाव या घटकांशी आहे.

**प्रस्तावनाः-**

फॉरेक्स ट्रेडिंगची सुरुवात सुमारे एक शतकापूर्वी झाली. विविध चलने आणि त्यांची गरज लक्षात घेता देवाणघेवाण बॅबिलोनी लोकांपासून अस्तित्वात होती. दुसरे महायुद्ध संपण्यापूर्वी ब्रिटन वूड्स कराराची स्थापना जुलै १९४४ मध्ये युएसए मध्ये झाली. न्यू हॅम्पशायरने नवीन जागतिक राखीव चलनाची जॉन मेनार्ड केन्सची सूचना नाकारली. युएस डॉलर वर तयार केलेल्या प्रणालीची बाजू IMF आणि जागतिक बँक आणि गेट यांची स्थापना झाली. दुस□्या महायुद्धातील उदयोन्मुख विजेत्यांनी टाळण्याचा मार्ग शोधला त्याच काळात असतील आर्थिक संकटे युद्धाला कारणीभूत ठरतात ब्रिटन ओड्स कराराला परिणाम म्हणजे हे निश्चित विनिमय दराची प्रणाली पुनर्संचित झाली. ब्रिटन वूड्स प्रणालीवर दबाव होता, कारण १९६० च्या दशकात राष्ट्रीय अर्थव्यवस्था वेगवेगळ्या दिशेने जात होत्या. गेली काही दशके परकीय चलन जगातील सर्वात मोठ्या जागतिक बाजारपेठेत विकसित होत असल्याचे दिसते. परकीय चलन बाजार हे फारच अनन्य आहे, कारण मोठ्या व्यापाराचे प्रमाण आहे जे प्रतिनिधित्व करते. जगातील सर्वात मोठा मालमत्ता वर्ग आणि भौगोलिक पसरल्यामुळे आणि सक्षम शनिवार व रविवार वळता दिवसाची २४ तास व्यापार परकीय चलनाचा बाजाराचे प्रमुख फायदे आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. परकीय चलन बाजाराच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२. परकीय चलन बाजाराची वैशिष्ट्ये आणि भारतातील परकीय चलनाची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३. परकीय चलन बाजाराचे फायदे आणि तोटे याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये याविषयी

संबंधित संदर्भ ग्रंथ नियतकालिके साप्ताहिक मासिके वेबसाईट इत्यादीचा समावेश करण्यात आला

आहे.

**परकीय चलन बाजाराचा इतिहास**

जोपर्यंत मानव व्यापार करत आहे तोपर्यंत परकीय चलन बाजार आहे. प्राचीन संस्कृतींनी धातूच्या नाण्यांद्वारे वस्तू आणि चलनांचा व्यापार केला, ज्यांचे मूल्य त्यांच्या वजनावर आधारित होते. विदेशी मुद्रा बाजार सुमारे ५०० वर्षांपूर्वी ॲमस्टरडॅममध्ये होते. एक्सचेंजने लोकांना विनिमय दर स्थिर करण्यासाठी मुक्तपणे चलनांचा व्यापार करण्याची परवानगी दिली. सन १८७५ मध्ये, सुवर्ण मानक लागू करण्यात आले, याचा अर्थ देशांना त्यांच्या सोन्याच्या साठ्याइतकेच चलन छापण्याची परवानगी होती. सोने दुर्मिळ, निंदनीय, गंजण्यास कठीण आणि मिळवण्यास कठीण असल्यामुळे ते पसंतीचे धातू होते. सन १९१३ मध्ये, लंडनमध्ये ७१ फॉरेक्स ट्रेडिंग फर्म होत्या, त्यामध्ये सन १९०३ मध्ये तीनपेक्षा अधिक वाढ झाली. परंतु जागतिक युद्धांच्या काळात सोन्याचे मानक टिकू शकले नाही, कारण देशांना खर्चासाठी अधिक पैसे

छापावे लागले. दुस-या महायुद्धानंतर ब्रेटन वुड्स प्रणालीची स्थापना झाली. त्यात बहुतेक चलनांना यूएस डॉलरमध्ये जोडण्याची मागणी करण्यात आली, ज्याला सोन्याचा साठा होता. सन१९७१ मध्ये, अध्यक्ष निक्सन यांनी वाढत्या महागाईमुळे आणि सोन्याच्या संभाव्य धावपळीमुळे डॉलरच्या सोन्यामध्ये परिवर्तनीयता गोठवण्याची घोषणा केली. १९७३ मध्ये, सोन्याचे मानक पूर्णपणे रद्द करण्यात आले आणि यूएस डॉलरला सोन्याच्या साठ्याचा आधार राहिला नाही. आणि परकीय चलन फ्री-फ्लोटिंग प्रणालीवर स्विच केले गेले. चलने त्यांनी निवडलेल्या कोणत्याही चलनाला पेग करण्यास किंवा अनपेग्ड राहण्यासाठी आणि चलनाचा पुरवठा आणि मागणी यांना त्याचे मूल्य निर्धारित करण्यास अनुमती देण्यास मोकळे होते.

**परकीय चलन बाजाराची वैशिष्ट्ये**

१. हे विकेंद्रित बाजार आहे, जे दिवसाचे २४ तास, आठवड्याचे ५ दिवस, एकाधिक टाइम झोनमध्ये कार्यरत असते.

२. उच्च व्यापाराचे प्रमाण आणि कमी व्यवहार खर्चासह हे जगातील सर्वात मोठे आणि सर्वात द्रव बाजार आहे.

३. आर्थिक निर्देशक, भू-राजकीय घटना आणि मध्यवर्ती बँकेच्या धोरणांसह बाजारावर विविध घटकांचा प्रभाव पडतो.

४. बाजार व्यापा-यांना विविध व्यापार धोरणांद्वारे चलन मूल्यांच्या हालचालींवर अंदाज लावण्याची संधी प्रदान करतो.

**परकीय चलन बाजाराचे प्रकारः-**

तीन मुख्य फॉरेक्स मार्केट आहेत: स्पॉट फॉरेक्स मार्केट, फॉरवर्ड फॉरेक्स मार्केट आणि फ्युचर्स फॉरेक्स मार्केट.

**स्पॉट फॉरेक्स मार्केटः**

स्पॉट मार्केट म्हणजे सध्याच्या एक्सचेंजमध्ये त्वरित चलनांची देवाणघेवाण जागेवर होते. हे एकूण विदेशी चलन बाजाराचा एक मोठा भाग बनते आणि वित्तीय क्षेत्राच्या संपूर्ण स्पेक्ट्रममधील खरेदीदार आणि विक्रेते तसेच चलनांची देवाणघेवाण करणा्या व्यक्तींचा समावेश होतो.

**फॉरवर्ड फॉरेक्स मार्केटः-**

फॉरवर्ड मार्केटमध्ये खरेदीदार आणि विक्रेता यांच्यात भविष्यात निश्चित केलेल्या तारखेला सहमतीनुसार चलनांची देवाणघेवाण करण्यासाठी कराराचा समावेश असतो. वास्तविक चलनांची देवाणघेवाण होत नाही, फक्त मूल्य. फॉरवर्ड मार्केटचा वापर हेजिंगसाठी केला जातो.

**फ्युचर्स फॉरेक्स मार्केटः-**

फ्युचर्स मार्केट फॉरवर्ड मार्केट सारखेच असते, ज्यामध्ये मान्य तारखेला एक मान्य किंमत असते. प्राथमिक फरक हा आहे की फ्युचर्स मार्केटचे नियमन केले जाते आणि एक्सचेंज होते. हे इतर बाजारपेठेतील जोखीम काढून टाकते. फ्युचर्स हेजिंगसाठी देखील वापरले जातात.

**भारतातील परकीय चलनाची सद्यस्थिती:-**

महामारीमुळे प्रभावित, रशियन-युक्रेन संघर्ष आणि चलनफुगवटा यातून सावरत भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक वर्ष २३ मध्ये महामारी पूर्वीच्या विकासाच्या मार्गावर जाण्यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये व्यापक प्रमाणात पुन्हा रुळावर येत आहे. आर्थिक वर्ष २४ मध्ये भारताची सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी ) वाढ जोमाने होईल अशी अपेक्षा आहे. आर्थिक वर्ष २४ साठी जीडीपीचा अंदाज ६-६.८% च्या श्रेणीत असेल. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत.खाजगी वापर आर्थिक वर्ष १५ नंतरचा सर्वाधिक आहे आणि यामुळे उत्पादन उपक्रमांना चालना मिळाली आहे परिणामी सर्व क्षेत्रांमध्ये क्षमता वापरात वाढ झाली आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर २०२२ मध्ये जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. २०२२ नुसार, भारताचे वार्षिक सकल उत्पन्न ८५४.७ अब्ज डॉलर एवढे आहे. व्ययशक्ती समानतेचा निकष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगातील सर्वात वेगात वाढणा-या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीनपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकासदर २००६-२००७ ह्या आर्थिक वर्षात ९.४ टक्के एवढा होता. परंतु, अतिशय मोठ्या

लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१डॉलर एवढेच आहे, तर PPP वर आधारित वार्षिक दरडोई उत्पन्न ४१२८ डॉलर एवढे आहे. जागतिक बँक भारताची "अल्प-उत्पन्न असणारी अर्थव्यवस्था" अशी गटवारी करते. भारताच्या आर.बी.आय चे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणाले की, १ डिसेंबर २०२३ रोजी भारताच्या परकीय चलन साठा ६०४ अब्ज डॉलर एवढा आहे. हा परकीय चलनाचा साठा देशाची ताकद दर्शवतो. त्यामुळे देशाची आयात निर्यात मोठ्या प्रमाणात होते.

**परकीय चलन बाजाराचे फायदे आणि तोटे**

**फायदे**

१. इतर बाजारांपेक्षा कमी नियम आहेत, याचा अर्थ गुंतवणूकदारांना इतर बाजारपेठांमध्ये आढळणा-या कठोर मानकांचे किंवा नियमांचे पालन केले जात नाही.

२. फॉरेक्स मार्केटवर देखरेख करणारी कोणतीही क्लिअरिंग हाऊस किंवा केंद्रीय संस्था नाहीत.

३. बहुतांश गुंतवणूकदारांना पारंपारिक फी किंवा कमिशन द्यावे लागणार नाहीत, ते दुस-या मार्केटमध्ये देतील.

४. परकीय चलन बाजार २४ तास खुला असतो, तुम्ही दिवसाच्या कोणत्याही वेळी व्यापार करू शकता, याचा अर्थ मार्केटमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतीही कट ऑफ वेळ नाही.

५. जर तुम्हाला जोखीम आणि बक्षीस बद्दल काळजी वाटत असेल, तर तुम्हाला पाहिजे तेव्हा तुम्ही आत आणि बाहेर जाऊ शकता आणि तुमच्या खात्यातील शिल्लक आणि तुमच्या ब्रोकरच्या लीव्हरेजच्या नियमांच्या आधारे तुम्हाला परवडेल तितके चलन तुम्ही खरेदी करू शकता.

**तोटे**

१. बाजार अनियंत्रित असल्याने फायदे मिळत असले तरी ते धोके देखील निर्माण करतात, कारण जोखीम-मुक्त व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी कोणतेही लक्षणीय निरीक्षण नाही.

२. परकीय चलन बाजार एव्हरेज नफा वाढविण्यात मदत करू शकते, परंतु उच्च नुकसान देखील होऊ शकते. एव्हरेजवर कोणतीही निश्चित मर्यादा नसल्यामुळे, गुंतवणूकदारांचे व्यवहार चुकीच्या दिशेने गेल्यास त्यांना मोठ्या प्रमाणात पैसे गमवावे लागतात.

३. व्याज पेमेंटद्वारे लाभांश आणि बाँडद्वारे परतावा देखील देऊ शकणा-या स्टॉकच्या विपरीत, FX व्यवहार केवळ प्रशंसावर अवलंबून असतात, म्हणजे त्यांच्याकडे काही इतर मालमत्तेपेक्षा कमी परतावा असतो.

४. FX मार्केटमधील पारदर्शकतेचा अभाव व्यापा-याला हानी पोहोचवू शकतो, कारण त्यांचे व्यवहार कसे केले जातात. यावर त्यांचे पूर्ण नियंत्रण नसते, कदाचित सर्वोत्तम किंमत मिळत नाही आणि माहितीचा मर्यादित दृष्टिकोन असू शकतो.

**निष्कर्ष:-**

परकीय चलन बाजार हा आर्थिक विकासातील सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशांतर्गत तसेच संस्थांतर्गत वस्तू आणि सेवांचा व्यापार वाढीस लावण्यासाठी परकीय चलन बाजारात वाढ होणे गरजेचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे अवलोकन केले असता असे निदर्शनात येते की, भारतीय आर्थिक जीडीपी चा दर ८.९ टक्के एवढा आहे. म्हणजेच भारताचा व्यापारतोल हा वाढलेला असल्याचे दिसून येते. व्यापाराच्या माध्यमातून परकीय चलनाचा साठा अधिकाधिक निर्माण होतो.

**संदर्भ**

१. भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. किरण देसले
२. भारतीय अर्थव्यवस्था, दत्तसुंदरम
३. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, डॉ. संजय तुपे
४. सार्वजनिक आयव्यय, एस. व्ही. ढमढेरे
५. आर्थिक सर्वेक्षण अहवाल सन २०२२ - २३

# हवामानातील बदल आणि साहित्य

*डॉ. डोईफोडे युवराज गोपीनाथ*
संशोधक विद्यार्थी (Ph. D. मराठी )

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत लेख हवामान बदल व साहित्य संबधी माहिती प्रशिध्द करणारा आहे. तसेच पहाता मराठी साहित्यामध्ये हवामान बदला विषयी लिखान वेगवेगळया लेखकांनकडुन अगदिच कमी पहावयास मिळते. अनेकांनपैकी संदर्भामध्ये संदर्भीत लेखक जसे की, मोतीराम, प्रा. प्रल्हाद लुलेकर आणि प्रा. वासुदेव मुलाटे यांचे साहित्य हे हवामान बदलाशी संबर्धीत आढळुन येते.

हा शोध निबंध हवामान बदल आणि मराठीतील साहित्य यांचा संबध दर्शविणारा शोध निबंध आहे. प्रामुख्याने या शोध निबंधमध्ये महाराष्टाची आणि पर्यायाने भारताची भोगोलिक परिस्थिती आणि भोगोलिक क्षेत्रफळ तसेच जल व्यवस्थापनाची रुपरेखा दर्शविजारा आहे. जसे की, वातावरण एक गतीमान आसुन तो सतत गतीमान असतो आणि त्याचा दर आणि गतीची दिशा या दोन्हीवर सौर, खंडाची भोगोलीक स्थिती महासागरातील प्रवाह आणि जमीनीच्या प्रष्टभाजावर वाढणारी वनस्पती या सह विविध घटकांचा प्रभाव असतो.

**शोध निबंधाचे संदर्भ :-**

1. मोतीराम यांच्या व्दारा लिखीत फुले आंबेडकरी साहित्य - अकलन आणि आस्वाद, कैलास पब्लीक औरंगाबाद या ग्रंथामध्ये त्यांनी विचारप्रवृत्त करणारी कविता: गल्ली बदललेला मोर्चा पुढील प्रमाणे विश्लेषन केले आहे. जसे की, आंबेडकरी साहित्यामध्ये गल्ली बदललेला मोर्चा या कवितेमध्ये आंबेडकरी विचारधारेमध्ये कलात्मक अविष्कार आहे. मोर्चा जेव्हा गल्लीत बदलतो तेव्हा हा मोर्चा कोणत्या दिशेने निघाला होता आणि आता कोणत्या दिशेने जातो आहे हे कविने अत्यंत चिंतन शिलतेने मांडले आहे. साहित्यामध्ये एकुण प्रवासाचा ज्ञवि साक्षिदार असल्याने पहिल्या पिढीची कविता आणि आजची कविता याची या कवितेच्या निमित्ताने तुलना होणे जशेक्रमप्राप्त आहे. तसे आजची कविता आणि गल्ली बदललेला मोर्चा यात ही तुलना होणे क्रमप्राप्त आहे. पहिल्या पिढीच्या कवितेतुन दलितांचे दुख: दैन्य, दाश्य व सामाजिक आन्यायाला कलात्मक रुप देण्याचा या प्रयत्नांत देव आणि धर्माला गाली प्रधान करण्याचे मोठी शक्ती खर्च पडत होती. आश्याच्या नवे पणाला काळाची गरज म्हणुन समिक्षकाने दलित साहित्य म्हणून मान्यता दिली. दलित कवितेची तुलना केशव सुतांच्या ज्ञविते बरोबर केली. कांही उथळ समिक्षकांनी ही कविता केशव सुतांच्या पुढे जात नाही असा शेरा मारुन तिला निकाली काढण्याचा प्रर्यन्त ज्ञेला. आशा पध्दतीने एकंदरीत आंबेडकरी साहित्यामध्ये उच निचतेचा प्रभाव जानवतो. परिणामी भुगोलिक परिसरामध्ये एका परिसरामधून दुसऱ्या परिसरामध्ये स्थलांतर होण्याचे चित्र आढळते.
2. प्रा. प्रल्हाद लूलेकरे लिखीत मराठवाडयातील मराठी वाडःमयाचा इतिहास या पुस्तकामध्ये हवामानातील बदल आणि साहित्याचा संबध या विष्ययी चर्चा केली आहे जसे की, मराठवाडयातील हवामान समशीतोष्ण असते. त्यामुळे पावसाळा काळात येथील हवामान कोरडेच राहते, हा भूभाग उष्णकटिबंधीय कक्षेत येत असल्याने पश्चिमेकडुन पुर्वेकडे उन्हाळा अधिक कडक स्वरुपात असतो उदा- औरंगाबाद, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड इ. जिल्हयामध्ये चढत्या क्रमांकाचा उन्हाळा असतो. हिवाळयातील डिसेंबर-जानेवारी महिन्यातील तापमान 13 अंश किमान आणि 29 अंश कमाल तापमान आसते उन्हाळयात हेच तापमान 35 अंश ते 45 अंश किमान तापमान आसते मराठवाडयातील पावसाचे प्रमाण खुपच लहरी आसुन मराठवाडयामध्ये आवकाळी पाऊस तसेच गारपीट जास्त प्रमाणात होते. मराठवाडयातील शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीस बळी पडावे लागते. तसे शेतकऱ्यांचे मुले स्थलांतर होतात. उपजिवीका भागवण्यासाठी त्यांना पुणे, मुंबई, हैद्राबाद अशा ठिकाणी जावे लागते. व स्वत:ची उपजिवीका भागवावी लागते. पाऊसाचा लहरी पणा सततचा दुष्काळ या समस्यांना मराठवाडयातील शेतकरी चिंतेत सतत बसलेलेला असतो. त्याची प्रगती होत नाही. मराठवाडयातील शेतकऱ्यांची मुले शिक्षणापासुन वंचीत राहतात. तसेच मराठवाडयातल्या शेतकऱ्यांना शेतीसाठी जे समुद्रात पाणी वाहुन जाते ते पाणी मराठवाडयात आणावित म्हणजे मराठवाडयातल्या शेतकऱ्यांचे जे दुष्काळाचे सावट दुर होऊन तो सदन होईल.

**डॉ. वसुदेव मुलाटे** यांनी लिहिलेल्या त्यांच्या ग्रामीण कथा: स्वरुप आणि विकास या पुस्तकामध्ये त्यांनी परिसर आणि ग्रामीण माजु-न या ज्ञथेमध्ये हवामान आणि परिसर या संदर्भात चर्चा केली आहे. त्यांच्या मते ग्रामीण आणि प्रादेशीक वाड.मयाच्या संदर्भात तरी लेखकाच्या अनुभवाचा जो परिसर असतो जेम क्षेत्र असते त्यास अतिशय महत्व असते. ग्रामीण समाजरचना ही कृषिकेंद्रीत समाज रचना आहे. कृषी केंद्रीत म्हटले की, शेतीच्या उद्योगाला पूरक अशा विविध व्यवसायाची मंडळी येणारच. उदा- सुतार, लोहार, अशी कारागीर मंडळी शेतकऱ्यांला शेतीत लागणारी आवजारे पूरवितात. म्हणजे शेतकरी व त्याला शेतीची अवजारे आणि जीवनउपयोगी गोष्टीचा पूरवठा करणारी कारागीर मंडळी यांच्यात परस्पर सहकार्याची देवाण-घेवाण असते. या शिवाय अनेक फिरस्ती मंडळी ही मधून-मधून खेडयात येऊन ग्रामीण जिवनाला परिपूर्णता आणित असतात.

यातूनच शहरी जीवनापेक्षा वेगळी अशी संस्कृती निर्माण झालेली आसते. या कृषी जिवनाशी संबधीत असे सर्व उत्सव या ठिकाणी साजरे केले जातात.

**शोध निबंधाची गृहीतके:-**

1. हवामान बदल आणि साहित्य यांचा संबध जुळवणे

2. हवामान बदलाचा थोडक्यात आढावा घेणे.

संशोधन पध्दती

या शोध निबंधाची संशोधन पध्दती ही दुय्यम माहितीच्या स्त्रोतावर अधारीत आहे. तसेच कांही लिखीत साहित्यकांच्या पुस्तकावर आधारीत आहे. दुय्यम माहितीचे स्त्रोत हे ऑनलाईन पध्दतीचे जसेकी, गुगल इ.

**हवामान बदलाची पार्श्वभुमी -**

संशोधनाचे एक महत्वाचे नविन क्षेत्र अचानक हवामान बदल 1980 पासून विकसित संशोधनाचे एक महत्वाचे नविन क्षेत्र अचानक हवामान बदल, 1980 पासुन विकसित झाला आहे हे संशोधन ग्रीनलॅड आणि अंटार्क्टिकाच्या बर्फाच्याकोर नोंदीमध्ये भूतकाळातील प्रादेशिक आजि जागतिक हवामानात अचानक बदल झाल्याचा पुरावा शोधून प्रेरित आहे याघटना ज्यांचे महासागर आणि महाव्दीपीय नोंदी मध्ये ही दस्तऐवजी ज रण केले गेले आहे. त्यात पृथ्वीच्या हवामान प्रणालीचे एक समतोल स्थितीतून दुय्यम स्थितीत अचानक बदल होता. अशा बदलामुळे वैज्ञानिज चिंतेचा विषय आहे. कारण ते हवामान प्रणालीच्या नियंत्रणाबद्दल आणि संवेदनशीलते बद्दल कांहीतरी प्रकट करु शकतात. विशेषत: तेनॉनलाइनरिटी दर्शवितात. तथाकर्थित टिपिंगपॉइंट्स जेथेसिस्टमच्या एका घटकामध्ये लहान हळूहळू बदल संपूर्ण सिस्टममध्ये मोठया प्रमाणात बदल घडवून आअणू शकतात. पृथ्वीप्रणालीच्या घटकांमधील जटिल अभिप्रायामधून अश्पा अरेखीयता उध्दवतात. उदरहरणार्थ- दरम्या-न यंगरड्रायस इव्हेंट उत्तर अटलांटिक महासागरात ताजे पाणी सोडण्यात हळूहळू वाढ झाल्यामुळे अटलांटिक खोऱ्यातील थर्मोहॅलिन परिसंचनण अचानक बदल झाले. हवामानातील आकस्मिक बदल मोठ्र्या सामाजिक चिंतेचा विषय आहेत. कारण भविष्यात असे कोणतेही बदल इतके जलद आणि मूलगामी असू शकतात की, कृषी पर्यावरणीय औद्योगिक आणि आर्थिक प्रणालींना प्रतिसाद देण्याची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची जमता ओलांडू शकते. अशा हवामान आश्चर्यासाठी समाजाच्या असुरक्षिततेचे मूल्यांकन करण्यासाठी हवामा-न शास्त्रज्ञ सामाजिक शास्त्रज्ञ, पर्यावरज शास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञा सोबत ज ाम करत आहेत.

**हवामान बदलाचे कारणे -**

1. **सौर परिवर्तन शिलता**

सौर परिवर्तन शिलतेची चमक सुर्याच्या उत्पत्तीपासुन झाल्याचे आढळते आणि ती सातत्याने वाढत आहे.

2. **हंजामी फरज -**

प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीला पृथ्वीची स्थिती अधिक पृथ्वीचे हालचाल या दोन्हीच्या समिश्राने पृथ्वीतील हंजामी फरज पहावयास मिळतो.

**हवामानातील बदल आणि शेतीचा उदय:-**

प्राण्यांची पहिली उत्पत्ती आशीयामध्ये 11000 ते 9500 वर्षापुर्वी जेव्हा शेळया आणि मेंडयांचा प्रथम कळप करण्यात आला तेव्हा पाळीव प्राण्याची खादय गव्हु, मसुर, राळ या नावाचे धान्य आणि बारली यांची लागवड 9000 वर्षापुर्वीची आढळुन येते. त्या नंतर आपणास पुरान अस्मयुगातील माणुस हळु-हळु शेती करु लागलेला दिसुन येतो. परंतु त्याची शेती अतिशय मागास असल्या कारणाने शेतीची उत्पादकता खुपच कमी होते. आणि पाळीव प्राण्याचे खादय जास्त प्रमाणात आपोआपच उत्पादक होत होते. अश्या प्रमाणे आधुनिक काळामध्ये शेती कसनारांची संख्या वाढत गेली. आणि यातुनच आपणास शेतीचा उदय झालेला दिसुन येतो. मानवास हवामानातील बदल हळु-हळु ज्ञात होत गेले. त्यानुसार माणुस हंगामी शेतीची सुरुवात करु लागला. उदा- पावसाळी शेती आणि उन्हाळी शेती.

**सारांश -**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये हवामानातील बदल आणि मराठीतील साहित्य यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच भोगोलीक परिस्थितीतील हालचाल आणि शेतीचा उदय यांचा प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे. पृथ्वीच्या तापमानातील अंदाज आणि त्या तापमानानुसार मानवाची शेती करण्याची पध्दती कश्या पध्दतीने विकसीत होत गेली याचा अंदाज आपणास या शोध निबंधावरुन संमजण्यास शुलभ होते.

**संदर्भ :-**

1. मोतीराम कटारे, फुले आंबेडकरी साहित्य : अकलन आणि अस्वादछ, कैलास पब्लीकेश-j
2. ा औरंगपुरा औरंगाबाद
3. प्रा. प्रल्हाद लुलेकर, मराठवाडयातील मराठी वाङ.मयाचा इतिहास, कैलास पब्लीकेशन औरंगपुरा औरंजाबाद
4. डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण कथाः स्वरुप आणि विकास कैलास पब्लीकेशन औरंगपुरा औरंगाबाद

# शाश्वत पर्यावरणीय विकासावर आर्थिक विकासाचा झालेला परिणाम -एक अभ्यास

*डॉ. सिध्देश्वर महादेव मुंडे*
कला महाविद्यालय, नांदूर घाट, ता.केज जि.बीड

**प्रस्तावना :-** आर्थिक विकास आणि पर्यावरण याचा सहसंबंध अगदी एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. ज्या कधीच एकमेकांपासून कधीच दूर ज रता येत नाहीत. मानव आपल्या सुरूवातीच्या काळापासून निसर्गातील घडणाऱ्या असंख्य घटनांतून शिकत आला. त्याच्या जडणघडणीत पर्यावरणाचा वाटा हा 100 % आहे. आज माणूस पर्यावरणाचा विचार केल्याशिवाय आपल्या आर्थिक विकासाची संकल्पनाही करू शकत नाही. या पर्यावरणाच्या आरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी भारतीय अनेक संस्थांनीही आपआपला सहभाग नोंदविला आहे. अनेक आंदोलने भारतात सुप्रसिध्द होती. त्यामध्ये सुंदरलाल बहुगुणा यांचे चिपको आंदोलन, मेधाताई यांचे जगप्रसिध्द नर्मदा बचाव आंदोलन, आंध्रप्रदेशातील अपिको आंदोलन, नामामी गंगे, नद्याचे शुध्दीकरण इत्यादी चळवळी अत्यंत महत्वाचे कार्य करत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होण्याच्या मागचे मुख्य कारण वेजवा-न प्रगती आणि मानवी समाजाच्या लालसेपोटी, आर्थिक विकास साधण्याच्या हव्यासापोटी पर्यावरणाकडे केलेले दुर्लक्ष होय. 200 वर्षाच्या मानवी प्रगतीच्या, ज्ञानाच्या वेगवान प्रगतीने मात्र मानवाला हवामानाचा विसर पडल्याने त्यात झालेला नाट्यमय बदल, प्रदूषनाचा गाठलेला अति उच्चतम दर, अनेक सजीव प्राणी यांच्या प्रजातीचा झालेला विनाश, अमर्याद झालेली आणि सातत्याने सुरु असलेली जंगलतोड याचा परिणाम असा झाला की, हवामानात प्रचंड स्वरुपाचा बदल घडून आला. त्यातून ग्लोबल वार्मिंग आणि ओझोल जय यासारजे पर्यावरजीय दोष निर्माज झाले. पाणी, जंगल आणि जमीन यांचे नियोजन आणि संवर्धन, आपण वेळीच केले नाही तर आज जे काही विकासाच्या वल्गना केल्या जात आहेत. त्या पुर्णपणे नाहीश्या होतील. प्रचंड अश्या वैश्विक महामारी असलेल्या नैसर्गिक आपतीला सामोरे जावे लागेल.

अ) नो गो एरिया या क्षेत्रात पर्यावरणाच्या बाबी समोर ठेवून कोळसा खाणीवर बंदी घातली. यातून उत्पादन आणि विद्युत उत्पादन योजना पूर्णपणे ठप्प झाली.

आ) महाराष्ट्र यामध्ये रक्षण यांचा मुद्दा समोर ठेवून लावासा होऊसिंग प्रोजेक्ट ला बंदी घातली.

इ) उत्तराखंड सरकारला अवैध खन्नन रोखण्यासाठी पर्यावरण मंत्रालयाने त्याला भाग पाडले यातून खाजगी उद्योजक मात्र कमालीचे चिडले यातून विकास कि पर्यावरण हा मुद्दा संपूर्ण भारतासमोर उभा राहिला.

ई) ओडीसा सरकार यांना आदेश देऊन निर्माण व पर्यावरण दोन्ही मुद्यावर जिंदाल स्टील यांना लाल झेंडे दाखवण्यात आली.

उ) महाराष्ट्रातील एनरोल प्रकल्प हा पर्यावरणाचे कारण दाखवून बंद करण्याचे आदेश पर्यावरण मंत्रालय यांनी दिले होते.

ऊ) टाटा नॅनो प्रकल्प हा पश्चिम बंगालमध्ये पर्यावरणाचे कारण दाखवून बंद करण्यात आला. हजारो एकर जमीन शेतकऱ्यांना वापस करण्यात आली.

**नव्या विकास रणनीतीची आवश्यकता :-**

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNDP) च्या अलीकडील अहवालानुसार संपूर्ण विश्वाची सिध्द अर्थव्यवस्था हिचा एकूण आकार हा 65 ट्रिलीयन डॉलर आहे. जर या एकूण अर्थव्यवस्था 65 ट्रिलीयन डॉलर पैकी कमीत कमी दोन टक्के अर्थात 1.3 ट्रिलीयन डॉलर हे जगातील दहा महत्वपूर्ण निवडक क्षेत्रात याची गुंतवणूक केली तर विश्वामधील सर्व अर्थव्यवस्था कार्बन विसर्जित करणाऱ्या इंधनाची हरित जैव तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था मध्ये बदलली जाईल. ही गुंतवणूक न केवळ गरिबी दूर करण्यास उपयुक्त ठरणार नाही. तर जगातील आर्थिक मंदी सुध्दा दूर करण्यास अत्यंत महत्वाची करेल. या अहवालानुसार जगाला त्यांनी अत्यंत निक्षून सूचना आणि भविष्यातील संकटाबद्दल सुध्दा सांगितले की, येणारा काळा हा अत्यंत नाजुक मोडवर आला आहे. अजूनही फारसी वेळ गेली नसून हि वेळ आपल्याला एक अवसर संधी प्राप्त ज रून देत आहे कि विकास नितीला हरित विकास नीती म्हणून बदलविण्याचा मार्ग प्रदान करत आहे. येणारे 21 वे शतक हे विकासाचे जैव नीतीमध्ये नियमितता राहील.

**नॅशनल यीन अकाऊंटिंग सिस्टम (GNA) -**

आर्थिक विकास पासून पर्यावरणाला होणारे नुकसान कमी कसे करता येईल आणि त्याचे मुल्यमापन कोणत्या प्रकारे करता येतील या वादातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने नॅशनल ग्रीन अकाउंटिंग सिस्टम (GNA) लागू करण्याचा निर्णय घेतला. याला लागू करण्यासाठी प्रख्यात प्रर्यावरण अर्वशाखी पार्थ गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एका कमिटीचे गठन करण्यात आले. या कमिटीत अत्यंत महत्वाचे विचारवंत म्हणून

किरीट पारीख, विजय केळकर, नितीन देसाई या सारखे अर्थतम यांचा समावेश करण्यात आला. त्यातील महत्वपूर्ण शिफारस म्हणून भारतातील संपूर्ण उद्योग जगताला तीन भागात विभागणी करणे होय जसे रेड यलो आणि ग्रीन होय. या शिफारशीनुसार भारतातील पर्यावरण रक्षण होणार होते. पण येणाऱ्या कोणत्याही सरकारने या शिफारशी कधीच पूर्णपणे लागू केल्या  नाहीत हे एक आपले दुर्दैव मानावे लागेल.

**शाश्वत विकासाच्या समस्या आणि त्यावर उपाययोजना -**

शाश्वत विकास साधनाचा म्हणजे पर्यावरणाचा मूल्याला आहे. त्या स्थितीत राखून ठेवणे आणि पुढच्या पिढीला आहे. त्या स्थितीत हस्तांतरीत करणे होय. मग असे करणे आज कुठल्याही देशाला का जमत नाही ?  काय कारण आहेत, याचा शोध घेणे म्हणजे शाश्वत विकासाच्या समस्या शोधजे हाये. या समस्या शोधून  झाल्यावर त्यावर उपाय सांगणे, अर्थात उपायोजना अंमलात आणण्ययासाठी उपाय योजना करणे होय.

**शाश्वत विकासाच्या समस्या -**

1) जैव विविधता ही सदैव कधीच राखून ठेवता येत नाही ही काळानुरूप आणि परिस्थिती नुसार बदलत असते.
2) वाढती लोकसंख्या ही शाश्वत विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे ती दूर करण्यासाठी काही केल्याशिवाय शाश्वत विकासाची संकल्पना कधीच पूर्ण होऊ शकत नाही.
3) पर्यावरण मंत्रालय जोपर्यंत आपले स्वनिर्णय घेत नाही आणि पूर्ण क्षमतेने काम करत नाही तो पर्यंत भारतातील प्रदूषण करमी करणे हे शक्य होजार नाही.
4) राजकारणी लोकांचा पर्यावरण व प्राधिकरण यांच्यातील हस्तक्षेप जोपर्यंत रोखता येणार नाही तोपर्यंत शाश्वत विकासाची संकल्पना करजे हे अत्यंत अवघड आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

**1)** दैनंदिन वृत्तपत्रे.

**2)** टेक्सट बुक

**3)** ग्रंथालय संपदा